भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

वर्ष ९ वे | जानेवारी – मार्च २०१५ | अंक ४ था

अध्यक्षः श्री. आनंद पराडकर मो.नं ९३२६८२६८८४
सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर मो.नं ९८५०९७९७०६
कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी मो.नं ९४४९०५१६५३

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. गणेश गुर्जर**
पुणे, ९८९०९९०११३
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे, ९९७०१७४८१८
**श्री. मकरंद फणसळकर**
पुणे, ९८२२६१७३२४

**शहर प्रतिनिधी :**
श्री. दिलीप धोपेश्वरकर, मुंबई, ९८२०५२१०९८
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, ९७६९३२९९९३
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२-२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये,आजगांव,जि. सिंधुदुर्ग, ९४२३८८०१३८

ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक – गणेश गुर्जर**

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदरांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/– (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000505 कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**– गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |

**नियतकालिकाचे नाव** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०
**संपादक** : श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा, स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर, विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


४ बकुळफुले – क्षणभंगुरत्व

५ पर्यावरण महर्षी श्री दत्तगुरु

५ डोंबिवली संघामध्ये दोन दिवसीय शिबीर संपन्न

७ पत्रप्रतिसाद

७ गावाकडची वाच्यता

८ व्यक्तीपरिचय – साहित्यसेवक कै. विठ्ठल सीताराम गुर्जर

९ हार्दिक अभिनंदन

९ मुलुंड संघातर्फे राणीलक्ष्मीबाई स्मृतीदिन साजरा

११ व्यक्तीपरिचय – विमा महर्षी अण्णासाहेब चिरमुले

१२ आनंद स्वामी – श्रीपाद भिकाजी ताटके

१३ चांदण्याचे थवे – सौ. वैशाली हळबे

१४ सुनील जठार यांना राष्ट्रीय समता फेलोशिप पुरस्कार

१४ श्रद्धांजली

१९ ‘इच्छापत्र’ आवश्यक का व कसे?

२० पाककृती

२२ रत्नागिरी संघातर्फे पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न!

२३ गूढरम्य ‘देवीहसोळ’

२६ संस्थावृत्त – नागपूर कऱ्हाडे ब्राह्मण संघ

३१ संस्थावृत्त – सातारा, आमचे उपक्रम – वर्धापनदिन


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. **– संपादक**

संपर्क



# संपादकीय

निवडणुकांची धामधूम संपली, सणवार झाले नवीन वर्षही सुरू झाले. प्रत्येक जण आपल्या मनात नवीन वर्षात काय करायचे याचे संकल्प करीत असतो. आपण हे कॅलेंडर वर्ष म्हणून नवीन वर्षाचे स्वागत केले. हिन्दू नववर्ष हे चैत्र महिन्यांत सुरू होणार. त्यामुळे आपणास काही संकल्प करण्यास, त्याचा विचार करण्यास अवधी आहे. एक महत्त्वाची गरज आज आहे ती म्हणजे ब्राह्मणांनी एकत्र येण्याची. या दृष्टीने गेली काही वर्षे प्रयत्न होत आहेत. पण ते सर्वांनी मिळून संघटीतपणे करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी सर्व ब्राह्मण उपशाखांनी प्रथम आपापली ज्ञाती संघटीत केली पाहिजेत! ती केल्यानंतर सर्व ज्ञातींनी एकत्रित आले तर ब्राह्मण समाजाचे मजबूतीकरण होईल. हे करावे असे वाटते कारण आज प्रत्येक जाती आपणांस आरक्षण मिळावे म्हणून जोरदार प्रयत्न करत आहे. सरकारने यावर गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. कारण आरक्षण हे किती असावे या संबंधी कांही नियम आहेत. असे नियम तोडून प्रत्येकास जर आरक्षण दिले गेले तर सर्वच समाज आरक्षित होतील. बारा बलुतेदारही त्यांचा व्यवसाय ही जात मानून आरक्षणासाठी प्रयत्न करीत आहेत. आंदोलने करीत आहेत आणि म्हणूनच ''आरक्षण'' ही एक गंभीर समस्या होणार आहे, झाली आहे. सध्या ७२% आरक्षण आहे, हे आपण सगळे जाणून आहोत.

त्यामुळे हा मुद्दा आपण ब्राह्मण ज्ञाती बांधवांनी लावून धरला पाहिजे; यामागे ब्राह्मणांना आरक्षण असावे म्हणून नव्हे; तर समतोल राखला जावा सर्व जातीजातीमध्ये सलोखा राहावा आणि खऱ्या अर्थाने सर्वधर्म समभाव रहावा अशी मनीषा आहे.

असो! आपल्या ज्ञातीपुरते बोलायचे झाल्यास कऱ्हाडे ज्ञातीने आपले एक संघटन उभे केले आहे आणि या महासंघाने वर्ष २०१५ मध्ये २५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. आणि ''संपर्क'' ही १० व्या वर्षांत एप्रिल २०१५ मध्ये पदार्पण करणार आहे. हा 'दुग्ध शर्करा' योगच म्हणावा लागेल. या निमित्ताने आपण ज्ञाती बांधवांनी ''रौप्य महोत्सवी'' वर्ष म्हणून साजरे करावे असे वाटते. जून २०१५ मध्ये आपण महासंघाची सर्व साधारण सभा घेत आहोत. नागपूर सभेमध्ये झालेले निर्णय सविस्तरपणे सादर केले आहेत.

आता सर्व संघांमध्ये मकरसंक्रांतीच्या कार्यक्रमांचे आयोजन झाले असेलच आणि आपण आपल्या प्रथेनुसार निश्चितच हा कार्यक्रम यशस्वी पार पाडू.

आपणा सर्वाना मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा!

## ‘बकुळफुले’

**डॉ. श्रीकृष्ण जोशी**
रत्नागिरी

**वाळूचं घड्याळ समोर ठेवून एकटक नजरेनं खालच्या भांड्यात पडणाऱ्या वाळूकडं बघत रहावं. मग समजतं, आपल्याही आयुष्यातून एकेक क्षण गळून जातो आहे.**



**क्षणभंगुराच्या कल्पनेत आनंद मिळतो हा विरोधाभास असला, तरी विचारांती ते एक निखळ सत्य नक्कीच आहे.**

# क्षणभंगुरत्व

क्षणभंगुरत्व म्हणजे काय असा प्रश्न मनात आला की, नजरेसमोर उभा राहतो तो पाण्याचा बुडबुडा. तो कोणत्या क्षणाला निर्माण होतो आणि कोणत्या क्षणाला फुटतो याचं वेळापत्रक सांगता येत नाही आणि असे असंख्य बुडबुडे पाण्यावर येत असतात, फुटत असतात. त्यामुळं कोणत्या बुडबुड्याकडं लक्ष ठेवून इप्सित साध्य करावं हे कळत नाही. याला क्षणभंगुरत्व म्हणायला हरकत नाही. कोणत्या क्षणी काय घडेल याचा अंदाज लागत नाही, काही क्षणापुरतंच अस्तित्व असतं त्यालाही क्षणभंगुरत्व म्हणायला हरकत नाही. क्षणभंगुरत्वाची कल्पना ज्याला कुणाला सुचली त्याच्या बुद्धी चातुर्याला दाद द्यायला हवी. नश्वर जगातलं सोपं रहस्य, किती चटकन त्यातून व्यक्त होतं.

माऊलींनी एके ठिकाणी म्हटलं आहे,
हे काळानळाच्या तोंडी। घातली लोणियाची उंडी
माशी पाख पाखडी। तव हे सरे।।

माणसाच्या आयुष्याची क्षणभंगुरता इतक्या सहजपणे माऊली सांगतात. आयुष्य किती असतं हे कुणालाही सांगता येत नाही. सांगता येतं ते हे, की माशीला पंख फडफडायला जितका वेळ लागतो तेवढ्या अवधीत आयुष्याचा खेळ संपूनही जातो हे क्षणभंगुरत्व. लोण्याचा गोळा अग्नीजवळ नेल्याक्षणी तो वितळतो. तो वितळण्याचा क्षण पकडता येत नाही. हे क्षणभंगुरत्व. कळी खूपच देखणी असते. त्या कळीचं फूल त्याहून देखणं असतं आणि फुलल्यानंतर फुलातून बाहेर पडणारा परिमल अवर्णनीयच. पण कळीचं फूल कोणत्या क्षणी होतं, फुलातला गंध कोणत्या क्षणी हवेत मिसळतो आणि शेवटी ते फूल कोणत्या क्षणी कोमेजायला लागतं हे समजत नाही आणि या सगळ्या प्रक्रियेतील क्षणही पकडता येत नाही. हे सगळं क्षणभंगुरत्व.

क्षणभंगुरत्वाची ही कल्पना कोणत्याही घटनेला लावता येते. खरं तर हा खेळही होऊ शकतो. वाळूचं घड्याळ समोर ठेवून एकटक नजरेनं खालच्या भांड्यात पडणाऱ्या वाळूकडं बघत रहावं. मग समजतं, आपल्याही आयुष्यातून एकेक क्षण गळून जातो आहे. शोभिवंत मासे काचपेटीत असतांना त्यांच्या हालचाली न्याहाळाव्यात. त्या पेटीत ऑक्सिजनसाठी ठेवलेल्या नळीतून बुडबुडेही येत असतात. दृश्य मोठं विलोभनीय असतं. पण सातत्यानं पहात राहिल्यावर समजतं, मघाच्या क्षणांच्या हालचाली आता लक्षात राहिलेल्या नाहीत. मघाशी दिसलेला बुडबुडा आत्ता दिसत नाही. एकतर तो विस्मृतीत गेलेला असतो. किंवा पुढच्या बुडबुड्याकडे वा हालचालीकडे लक्ष देतांना दुर्लक्ष झालेलं असतं. असे कोट्यावधी क्षण येतात, जातात त्यातले काही क्षण आपण पहातो, उपभोगतो, सोडून देतो. चव लागल्यावर एखादा अन्नपदार्थ क्षणाच्या बाबतीत होतं. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर क्षण नश्वर असले तरी त्याचा मोह सुटत नाही. क्षणभंगुरत्वाची कल्पना मनात काही क्षणच टिकते. कारण आपण मोहाच्या क्षणांना बळी पडलेलो असतो. त्याक्षणी नश्वरतेचा विचारही मनात येत नाही. माशी पाख पाखडी। तव हे सरे।। या ओवीतील ’तव हे सरे’ शब्द मनात पोहोचत नाहीत.

माणसानं जगतांना क्षणांना किती जपायला हवं याचं भान या संकल्पनेत दडलेलं आहे. येणारा प्रत्येक क्षण जाणारा आहे. तो क्षण, त्याक्षणी उत्कटपणे जगून सोडून द्यायला हवा. इतकी अलिप्तता आली की मोह होऊ शकत नाही, याचं भान जो ठेवतो तो जिंकतो. अर्थात हे आदर्शवत तत्त्वज्ञान झालं. प्रश्न असा निर्माण होतो की, व्यवहारात खरंच हे शक्य आहे का? प्रत्येक क्षणांवर विजय मिळवणं, प्रत्येक मोहावर विजय मिळवणं, नश्वरतेची जाणीव सातत्यानं मनात ठेवणं, हे खरंच शक्य आहे कां? तर त्याचं उत्तर नाही, असंच आहे. आपण इतके स्थितप्रज्ञ नसतो. निर्मोही नसतो. त्यामुळे आदर्शवत असणारं तत्वज्ञान जगणं अशक्य असतं. पण हे विचार जर आपण सतत मनात ठेवले तर पूर्णत्वानं नाही पण त्या दृष्टीनं तर वाटचाल करू शकतो. सर्व संग परित्याग करून विरक्त वृत्तीनं जगणारे फार थोडे असतात. पण ऐहिक जगात विरक्त वृत्तीनं जगणारे आपल्या आजूबाजूला अनेक असतात. त्याचं अनुकरण आपण करू शकतो. विरक्त वृत्तीनं राहताना गरजा आपोआप कमी होत जातात. सर्वच गोष्टीतलं नश्वरत्व जाणवू लागतं. समान दृष्टी मिळते आणि जगण्यातला एक वेगळाच आनंद समोर जाणवू लागतो.

क्षणभंगुराच्या कल्पनेत आनंद मिळतो हा विरोधाभास असला, तरी विचारांती ते एक निखळ सत्य नक्कीच आहे.

श्री दत्तात्रेयांनी पर्यावरणांतील २० घटकांना स्वत:चे गुरुस्थानी स्थान दिले आहे. त्यांच्या या महान कृतीमुळे या देवतेने पर्यावरण शास्त्राला अत्युच्च शिखरावर ६००० वर्षांपासून नेऊन ठेवले आहे.

# पर्यावरण महर्षि श्रीदत्तगुरु

नुकतीच दत्त जयंती झाली. पर्यावरण या विषयामध्ये श्रीदत्त यांचे योगदान फारच महत्त्वाचे आहे. कारण अध्यात्माचा मार्ग विज्ञानातूनच जातो आणि पर्यावरण हा एक वैज्ञानिक विषयच आहे. दत्त महात्म्यामध्ये श्री गुरुदेव दत्त यांचे सुमारे ६००० वर्षापूर्वीचे विज्ञानातील सर्व शाखांमधील ज्ञानाचे प्रचंड प्रभुत्व व त्यावरील सखोल मिमांसा ही स्तिमित करणारी आहे. दैनंदिन पर्यावरणातून मानवाने मोक्षाप्रती कसे जावे त्याचे इतके सोपे, सहज सुंदर, सामान्य माणसालाही सहज समजणारे विवेचन या व्यतिरिक्त कोणत्याही ग्रंथात आढळत नाही. एवढेच नव्हे तर आधुनिक जगातल्या पर्यावरणवादी तज्ञाला ही वैचारिक सखोलता शोधून सापडणार नाही.

मानवाने पर्यावरणाचा आदर्श पुढे ठेवून जीवनांत सफलता मिळवून जीवन परिपूर्ण जगून मोक्षप्राप्ती कशी करावी याचे सुरेख विवेचन भगवान श्री दत्तगुरुंनी करून उपदेश दिला. हाच शाश्वत जीवनाचा पाया आहे. इतकेच नव्हे तर पर्यावरणाचे महत्व बिंबविण्यासाठी माणसाने त्याला जीवनांत अग्रस्थान द्यावे. यासाठी भगवान श्री दत्तात्रेयांनी पर्यावरणांतील २० घटकांना स्वत:चे गुरुस्थानी स्थान दिले आहे. त्यांच्या या महान कृतीमुळे या देवतेने पर्यावरण शास्त्राला अत्युच्च शिखरावर ६००० वर्षांपासून नेऊन ठेवले आहे. पर्यावरणातील चांगल्या



गोष्टी आत्मसात करणे, वाईट गोष्टींचा त्याग करणे, यातून क्षमा, सहनशक्ती, अहंकार, त्याग, परोपकार स्वल्पता, एकाग्रता, श्रद्धा, वैराग्य इ. गोष्टींचा अभ्यास कसा करता येईल याचे सुरेख विवेचन या ग्रंथामध्ये आहे.

भगवान दत्तात्र्य हे नेहमी ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पर्यावरणवादी, पशुपक्षी तज्ञ आहेत. श्री भगवान दत्तात्रयांनी एकूण २१ जणांना गुरुस्थानी मानले आहे ते म्हणजे

१.पृथ्वी २.वारा ३. आकाश ४.पाणी ५.अग्नी ६.चंद्र ७.सूर्य ८.समुद्र ९.कबूतर १०.अजगर ११. पतंग (किडा) १२.भुंगा १३.मधमाशी १४.हरिण १५.हत्ती १६.टिटवा १७. सर्प १८.कोळी १९.मासा २०. कुंभारीण(माशी) २१.पिंगळा(नावाची वेश्या)

वरील सर्वाद्वारे पर्यावरणाची किमया कशी साधली गेली आहे, हे आपण पुढील ४ भागामध्ये विस्तृतपणे समजून घेऊ या.

**– डॉ. प्रमोद मोघे, पुणे**
**मो. ९३२५३८००९३**

# डोंबिवली संघामध्ये दोन दिवसीय शिबिर संपन्न

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाने प्रायोजकांच्या सहकार्याने ''शोध उत्तम निवेदकाचा'', हे दोन दिवसांचे शिबिर दिनांक १३ व १४ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळात आयोजित केले होते. या शिबिराला मार्गदर्शक म्हणून आद्य मुलाखतकार श्री. सुधीर गाडगीळ व प्रथित यश निवेदक श्री. मिलींद कुलकर्णी यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.

या शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला आसाम, रत्नागिरी, रोहा, पुणे, पनवेल, बदलापूर वगैरे ठिकाणाहून १०२ शिबिरार्थी यांत सहभागी झाले. ९वीतील विद्यार्थिनीपासून ८१ वर्षाच्या बुजुर्गांनी या शिबिरात हजेरी लावली. विशेष कौतुकाची बाब म्हणजे युवक–युवतींची संख्या लक्षणीय होती. सूत्र संचालनातील व निवेदनातील खूपशा साध्या वाटणाऱ्या पण अत्यंत महत्वाच्या गोष्टी समजावून सांगितल्या. साधं, सोपं,अनौपचारिक बोलणं, मांडणीत विचारांची स्पष्टता, प्रवाही भाषा, देहबोली, भाषेवरील प्रभुत्व, त्यासाठी लागणार चौफेर वाचन अशा किती तरी गोष्टीवर हसत खेळत चर्चा करत मार्गदर्शन केले. समारोपाच्या सत्रात प्रात्यक्षिक म्हणून लोकसत्ताचे संपादक श्री. गिरीश कुबेर यांची श्री. सुधीर गाडगीळ यांनी मुलाखत घेतली.

डोंबिवलीत प्रथमच अशाप्रकारचे शिबिर संस्थेने आयोजित केले.

**दिवाळी पहाट**

दिनांक २३ ऑक्टोबर २०१४, लक्ष्मीपूजन या दिवशी संस्थेने दिवाळी पहाट' या कार्यक्रमाचे आयोजन केले.


धुवांधार कोसळणाऱ्या सरींप्रमाणे होणारी तानांची बरसात, हृदयाला भिडणारी सुमधुर सुरेल आलापी, गमक खटक्यांनी खुलवलेली ख्याल गायकी अन् श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेणारी व कानसेनांना तृप्त करणारी उपशास्त्रीय गायकी – अशा सर्वांग सुंदर गायनाने भारलेल्या मैफलीची मेजवानी डोंबिवलीच्या कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाने जाणकार मर्मज्ञ व रसिक श्रोत्यांना दिली.

या कार्यक्रमाच्या सादरकर्त्या होत्या तरुण, गुणी शास्त्रीय संगीताचं भविष्य उज्वल आहे हे पटवून देणाऱ्या सुविद्य गायिका – कु. नुपूर काशिद!

**– स्वाती प्रभूदेसाई, डोंबिवली**

## सोयीस्कर

''तुझी बायको काटकसरी आहे कारे?
बंडूने खंडूला विचारले
''कधी कधी खात्रीने असते,
''खंडू म्हणाला,
''अरे परवा तिचा ३१वा वाढदिवस
होता ना,
तिनं फक्त २६च मेणबत्त्या
आणल्या.''



**– संकलन –**
**केशव फडणीस**

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

An Aesthetic Essence To Advertising

Domination in

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१–२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

## पत्र प्रतिसाद

अखिल भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या संपर्क त्रैमासिकाच्या 'संपर्कात'' मी जुलै २०१४ पासून आहे. अंकाचे सुरेख मुखपृष्ठ पाहूनच मी त्याच्या प्रेमात पडलो. त्यातील विविध सदरे/ साहित्य वाचनीय आहेच. तसेच मलपृष्ठावरील व्यक्तिमत्वांची छायाचित्रे पाहून खूप माहिती मिळते. नवीन पिढीला हा ज्ञानाचा खजिनाच आहे. जुलै-सप्टेंबर अंकातील मा. द.वा. पोतदार यांचा परिचय यथायोग्य आहे. त्यांना मी जवळून पाहिले/अनुभवले असल्याने आठवणींना उजाळा मिळाला. ऑक्टोबर-डिसेंबर अंकातील श्री. हळबेशास्त्री यांचा परिचय मला नवीनच आहे, मात्र तो उद्बोधक आहे.

एकूणच संपादकांनी संपादनात खूपच परिश्रम घेतले आहेत. अंकाच्या पुढील वाटचालीला हार्दिक शुभेच्छा!

**- य. वि. हर्डीकर, पुणे**
**मो. ९३७३५९९०८४**

## गावाकडची वाच्यता

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राचीन काळापासून गांवऱ्हाटी स्थापन झाली आहे. पूर्वीच्या काळी या देवऱ्हाटीतूनच गावाची सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होत होती. प्रत्येक गांवात निरनिराळ्या देवतांची भव्य दिव्य अशी मंदिरे आहेत. त्याच्या व्यवस्थापनासाठी मानकरी मंडळी आहेत. परंतु आज ही मानकरी मंडळी मानापानासाठी आपसांत भांडत आहेत. त्यामुळे गांवागावांत अनेक तट निर्माण झाले आहेत. देवस्थाने बंद पडली आहेत. गावांत सुख शांती नांदण्याऐवजी गावऱ्हाटी हा एकच कळीचा मुद्दा झाला आहे.

तेथील तरुणांच्या हातात पैसा येत नाही. त्यामुळे तेथील तरुण अवैध धंद्याकडे वळत आहेत.

त्यामुळे गावांत शांतता कशी राहणार? कोकणांतील माणूस शक्यतो स्वत:चा उद्योग धंदा करण्याच्या विचारात नसतो. नोकरी मिळवण्याकडे त्याचा कल असतो. इंग्रजांच्या काळापासून नोकरी करण्याचीच त्याची मानसिकता अद्याप बदललेली नाही. मुंबईतील गिरण्या बंद झाल्या आणि त्याचवेळी कोकणी माणूस संपला. परंतु मुंबईचा ओढा तसाच आहे.

पूर्वी गावांत बलुतेदार पद्धत होती. त्यामुळे सुतार-लोहार, न्हावी, कुंभार होडीचा तरवाला आदी सर्व बलुतेदार आपापली कामे उत्तम प्रकारे करून शेतीवर आधारित धंदे करून शेतकऱ्याकडून धान्य रुपाने बलूत घेऊन आपला चरितार्थ चालवीत असत. आता हे सर्व उद्योग कालमानानुसार बंद झाले आणि कारागीर रिकामे झाले. नोकरी मिळत नाही. धंदा करणे शक्य होत नाही मग पर्याय उरला तो शेतीचा पण शेती करणे तोट्यात आहे. त्याची कारणेही अनेक आहेत.

अशामुळे शेतकरी पुरा हवालदील झाला आहे. त्यामुळे घरांघरांतून संघर्ष भांडण तंटे सुरू आहेत. कुटुंब प्रमुखाला कुटुंब चालवणे मुश्कील झाले आहे. जगात सर्व सोंगं आणता येतात. परंतु पैशाचे सोंग कसे आणणार? परंतु या भागातील शेतकरी आत्महत्या न करता सदैव निसर्गाशी टक्कर देत जीवन जगत असतो व आहे.

रत्नागिरी व सिंधुदुर्गातील लोकांनी गोधन पाळणे जवळ-जवळ बंद केले आहे त्यामुळे जोताला बैल जोडी व दुधाला म्हैस पाळणे मुश्कील झाले आहे. साधी जोताची बैल जोडी घेण्यासाठी ३५ ते ४० हजार रुपये मोजावे लागतात हे तेथील शेतकऱ्यांना न परवडणारे आहे. त्यामुळे शेतीला शेणखत मिळणे बंद झाले आहे. आता रत्नागिरीला व सिंधुदुर्गात फलोद्यानाच्या बागा झाल्यामुळे गुरे चरण्यास नेण्याची पूर्वीची पद्धत बंद झाली आहे. परंतु यावरही योग्य उपाय आणि नियोजनाची गरज आहे.

इंग्रजांच्या काळात शाळा म्हणजे कारकून तयार करण्याचे कारखाने होते. आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये तीच परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण आजचा विद्यार्थी शेतीत राबणे आणि श्रमाचे काम करणे कमीपणाचे मानतो. तो शेतीकडे कसा वळणार? पूर्वीची एकत्रित कुटुंबपद्धती सध्या कालबाह्य झाली आहे. कुटुंबाचे विभाजन होऊन 'हम दो हमारे दो' या पद्धतीचा अवलंब केला जात आहे. त्यामुळे वडिलोपार्जित जमिनीचे विभाजन होऊन लहान लहान तुकड्यात रुपांतर झाले आहे.

कोकणांत काही सामुदायिक जमिनी आहेत. त्या जमिनीत १० ते १५ हिस्सेदार असतात पूर्वी या जमिनीत सामुदायिकरित्या शेतीवाडी केली जात असे परंतु काही हिस्सेदार बाहेर शहराकडे स्थलांतरित झाल्यामुळे किंवा काही जणांनी उद्योगधंद्याकडे लक्ष केंद्रीत केल्यामुळे सामुदायिक क्षेत्र असलेल्या जमीनी ओस पडल्या आहेत.

वडिलांच्या मिळकतीत सर्व मुलांना हक्क शाबीत करण्यासाठी स्थावर व जंगम मालमत्तेच्या ७/१२त बहिणीचाही नावे लिहिली जातात. स्त्रियांना समान हक्क देण्याच्या दृष्टीने सरकारचा कायदा योग्यच आहे. परंतु व्यवहारिक दृष्ट्या आजचा शेतकरीभाऊ अडचणीत येत आहे. ज्यावेळी भावाला एखाद्या शासनाच्या योजनांचा फायदा घ्यावयाचा असेल किंवा शेती विकासासाठी बँकेचे कर्ज घ्यावयाचे असेल त्यावेळी ७/१२ वर नावे असलेल्या **पान क्र. १३ वर**




# व्यक्तीपरिचय

## साहित्यसेवक कै. विठ्ठल सीताराम गुर्जर

''कशी या त्यजुपदाला'', 'सत्यवदे वचनाला नाथा', प्रभु अजि गमला मनी तोषिला, 'दया छाया घे', 'झणि दे कर या', ''ललना मना, राजस बाळा'' या अविट नाट्य पदांचे जनक म्हणून ज्यांनी लोकप्रियता मिळवली ते नाट्य पदकार कै. विठ्ठल सीताराम गुर्जर झाले असे की, ''एकच प्याला'' नाटकाचे गद्य लेखन कै. राम गणेश गडकरी यांनी केले आणि हे नाटक कै. बालगंधर्व यांनी बसवायला घेतले या दरम्यान गडकरी आजारी पडले आणि नाटकांतील पदे कोणी लिहायची हा प्रश्न पडला. ग़डकरी म्हणाले विठ्ठल सीताराम गुर्जर हे सध्या नाट्यपदे लिहितील व ते (गडकरी) बरे झाले म्हणजे नाट्यगीते लिहितील परंतु गडकरी आजारातून बरे झाले नाहीत आणि त्यांचे दु:खद निधन झाले. त्यामुळे ''एकच प्याला'' या नाटकांत कै. विठ्ठल उर्फ अण्णासाहेब सीताराम गुर्जर यांचीच पदे राहिली व ती अजरामर झाली. या एकूण २५ नाट्यपदांना चाली सुंदराबाई जाधव यांनी दिल्या होत्या.

कै. अण्णासाहेब गुर्जरांनी खूप साहित्य सेवा केली त्यांनी एकूण ७०० कथा, गोष्टी, त्याचप्रमाणे देवदास, नागमोड, पौर्णिमेचा चंद्र प्रेमसंयोग, गौप्य गोपान, भ्रमनिरास, संगीत प्रणय मुद्रा, संगीत राजलक्ष्मी, जीवनसंध्या, हतभागिनी, प्रितीची रीत, वाचनमाला अशा अनेक कादंबऱ्यांचे लेखन झाले. त्यांनी लिहिलेले संगीत नंदकुमार हे नाटक गाजले. नटसम्राट बालगंधर्व हे नाटक करीत असत त्यामधील गीते खूप लोकप्रिय झाली.

असे हे अण्णासाहेब उर्फ विठ्ठल सीताराम गुर्जर यांचा जन्म १८८५ मध्ये राजापूर तालुक्यात झाला; तर कर्मभूमी कशेळी. कशेळीला बरीच गुर्जर घराणी आहेत. कै. अण्णासाहेबांचे वडील सीतारामपंत बाबाजी गुर्जर हेही साहित्यिक होते. त्यांचाच वारसा, अण्णासाहेबांना मिळाला. कै. अण्णासाहेबांनी कशेळी गावासाठी खूप कार्य केले. त्यांनी श्री. लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळाचे स्कूल कमिटीचे चेअरमन म्हणून काम पाहिले आणि त्याचबरोबर साहित्य लेखनही केले. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे कथेचे



औत्सुक्य वाढविण्यासाठी रहस्याचा वापर करून शेवटी आनंद पर्यायवासी कलाटणी देऊन वाचकांना सुखद धक्का देणे हे होय.

कै. अण्णासाहेब कशेळीत रहात होते. पण त्यांचे स्वत:चे घर ही उभे राहू शकले नाही. एवढे धबधब्यासारखे साहित्य असूनही त्या साहित्यामधील काहीच कथा शिल्लक आहेत. त्यांच्या या साहित्य, शिक्षण क्षेत्रातील कार्यामुळे कशेळी ग्रामस्थांना त्यांच्याबद्दल नितांत आदर होता.

कै. अण्णासाहेबांचा स्वभाव थोडासा तापट आणि अलिप्त राहणी होती. ते पूर्णपणे निर्व्यसनी होते आणि साधेपणाने रहात. ते मितभाषी व प्रसिद्धी पराङ्मुख होते. ते भावनाप्रधान असले तरी ते नास्तिक होते असं वाटते कारण कशेळी मधील देव कनका दित्याचे मंदिर असूनही आणि ते तेथून जात असतांना त्यांनी कधी देवाला साधा नमस्कारही केल्याचे दिसले नाही. कै. अण्णासाहेब भावनाप्रधान असल्याचे त्यांच्या कृतीवरून दिसते. त्यांची ३वर्षाची नात मृत्यु पावली त्या जागी स्मशानात ते दररोज जात असत व तेथे ते पेपरमिंटच्या गोळ्या ठेवत. नातीच्या स्मृती दिवशी ते व त्यांच्या पत्नी उपवास करत. स्वभाव अलिप्त असल्यामुळे काही निवडक मित्रांशिवाय म्हणजे मेव्हणे रघुनाथराव कळके, भास्करराव सावरे, जगन्नाथराव सावरे यांचेकडे उठबस असे तरीपण जर कशेळीत आपल्या ज्ञातीमध्ये जर कोणाचे निधन झाले तर ते अंत्य यात्रेमध्ये हमखास जात असत.

कशेळी ग्रामस्थांना कै. अण्णासाहेबांबद्दल वाटत असलेल्या आदराचे स्मारकात परिवर्तन व्हावे असे वाटत होते आणि म्हणून १९८५ च्या दरम्यान लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळीने वार्षिक साधारण सभेमध्ये एक ठराव करून कै. अण्णासाहेबांचे स्मारक व्हावे म्हणून कै. विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर स्थापन करण्याचा ठराव करून त्यांच्या २५ व्या स्मृतिदिनी कै. विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिराची स्थापना झाली.

प्रत्येक माणसाच्या स्वभावांत कांही मर्मस्थाने असतात त्यास कै. अण्णासाहेब अपवाद नाहीत. त्यांना सभा कंप आणि परीक्षा कंप होता. त्यामुळे त्यांनी कधीच सभा संमेलनात सहभाग घेतला नाही. अगदी त्यांची साहित्य संमेलनाध्यक्षपदी नेमणूक झाली त्या सभेत व संमेलनाध्यक्ष म्हणून तिथेही गेलेले नाहीत. ते बी.ए. पर्यंत शिकले परंतु परीक्षा कंपामुळे त्यांनी पुढील शिक्षण घेतले नाही असे जरी असले तरी आज अभिमानाने नमूद करावेसे वाटते की, त्यांनी लिहिलेली पुस्तके, कादंबऱ्या बी.ए.च्या अभ्यासक्रमासाठी लावली होती.

अशा या विलक्षण प्रतिभा असलेल्या परंतु प्रसिद्धी पासून दूर असलेल्या साहित्यिकाची जीवन यात्रा १९ सप्टेंबर १९६२ रोजी समाप्त झाली.


**– गणेश गुर्जर**

संकलन – स्मरणिका विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर स्मरणिका व आर्य संगीत प्रसारक मंडळातील लेखनामधून

### बुडत्याला (बिन) पाण्याचा आधार

''बुडणाऱ्या माणसाला वाचविण्याचे ताबडतोब दोन उपाय सांग!'' गुरुजी म्हणाले.


''पहिलं म्हणजे त्याला पाण्याबाहेर काढायचं'', बंडू म्हणाला, ''अन् दुसरं त्याच्यातलं पाणी बाहेर काढायचं.''



**– संकलन –**
**केशव फडणीस**

## हार्दिक अभिनंदन!!!


### ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर



ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना नुकताच महाराष्ट्र साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यांनी खगोलशास्त्रामध्ये मोठे कार्य केले आहे. याशिवाय त्यांनी अनेक पुस्तके लिहीली आहेत.

डॉ. श्री. जयंत नारळीकर यांचे या निमित्ताने भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### ज्येष्ठ रंगकर्मी आणि अभिनेते श्री. श्रीकांत मोघे



ज्येष्ठ रंगकर्मी आणि अभिनेते श्री. श्रीकांत मोघे यांना महाराष्ट्र राज्याचा जीवन गौरव पुरस्कार नुकताच मिळाला. त्यांना एकीकडे कुस्तीची ईर्षा तर दुसरीकडे गाण्याचे अंग पण ते रमले रंगभूमीवरच.

श्री. श्रीकांत मोघे यांचे या निमित्ताने 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' हार्दिक अभिनंदन करीत आहे.


*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com


# मुलुंड संघातर्फे राणीलक्ष्मीबाई –स्मृतीदिन साजरा

कऱ्हाडे ब्राह्मण संघ– मुलुंड यांचे तर्फे दि. २९ जून २०१४ रोजी विरंगुळा केंद्र – येथे राणीलक्ष्मीबाई –स्मृतीदिन साजरा करण्यात आला.

अध्यक्ष श्री. मंडपे यांनी उपस्थितांचे स्वागत करून राणी लक्ष्मीबाईच्या 'पराक्रमी आणि शूरपणा' बद्दल माहिती सांगितली. राणी लक्ष्मीबाई – कऱ्हाडे ज्ञातीची माहेरवाशीण होती. याचा अभिमान निश्चितच आपणांस हवा. तिच्या शौर्याची आठवण म्हणून आपले युवा– श्री. प्रसाद करकरे आणि कु. पल्लवी महाजन यांनी सवेष – वाचिक अभिनयाद्वारे नाटुकली सादर केली. आजच्या युगातही अशाच रणरागिणी कशा तयार होत आहेत. त्याची आवश्यकता कशी आहे ते या नाटुकलीतून अभिनित केले.

श्री. विश्वनाथ आठल्ये यांनी अजरामर गीत 'पराक्रमाची ज्योत मावळे – इथे झाशीवाली' हे सर्व कडव्यांसह जोशपूर्ण आवाजात म्हटले. अर्थात सर्वांनी उस्फूर्तपणे त्याला साथ दिली.' स्पर्श दिव्यत्वाचा' या कार्यक्रमाच्या सीडीचं प्रकाशन पं. प्रदीप नाटेकर यांचे हस्ते झालं. त्यांचा सत्कार यावेळी अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला. नवीन सभासदांचा परिचय झाल्यावर विवेक शहाणे यांनी वेगळ्याच शैलीत यथोचित आभार मानले. योगिता वाकणकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

**– माधुरी शेंबेकर, सचिव–मुलुंड, मो. ९८६९०४९३५२**

## शुभेच्छा

**एक शब्द प्रेमाचा, आयुष्य फुलवतो**
**एक तीळ स्नेहाचा, मने जोडतो**
**स्वभावातील गोडी जणू, खडा गुळाचा**
**स्नेह होवो वृद्धिंगत, आपणा साऱ्यांचा ।।**
**सात दिवसांचा सप्ताह नको**
**वायदा आयुष्य भराचा**
**तीळ गूळ ही प्रतिके नकोत**
**मोह हवा आपुलकीचा।।**
**ऐकता बोलता गोड शब्द**
**दुःख विसरू आयुष्यातले**
**साथ देता एकमेकांना**
**सुख अनभवू लाखमोलाचे।।**
**आयुष्यातले हे संक्रमण**
**यशदायी होवो**
**हे वर्ष साऱ्यांचे**
**निरामय जावो।।**

**– स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, मो. ९७६९३२९९९३**


लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी केटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल
आता
वातानूकुलित
शुभमंगल
कार्यालय
आणि
एव्हरेस्ट
हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

## व्यक्तीपरिचय

# विमा महर्षी अण्णासाहेब चिरमुले - स्मृतीगंध



शिवछत्रपतींच्या वास्तव्याने पावन झालेले सातारा हे शहर सात दऱ्यांच्या डोंगर कुशीत वसले आहे. निसर्गाची मुक्त उधळण अनुभवणारे तसेच श्री. समर्थ रामदास स्वामी, परमपूज्य ब्रह्मेंद्र स्वामी, गोपालनाथ महाराज, श्रीधर स्वामी यांची असीम कृपा लाभलेले हे शहर स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांच्या हौतात्म्यामुळे संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. साताऱ्च्या इतिहासाला राजघराण्याचा वारसा लाभला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या घराण्याची ओजस्वी परंपरा इथे समृद्ध झाली. साताऱ्च्या मातीचा सुगंध अनेक दिग्गज आणि मातब्बर मंडळींनी सर्वत्र दरवळत ठेवला. ही नगरी विमा महर्षी अण्णासाहेब चिरमुले यांची कर्तृत्वभूमी. अशा या पुण्यभूमीत वासुदेव गणेश तथा अण्णासाहेब चिरमुले यांचा जन्म ४ जून १८६४ रोजी झाला. त्यांच्या तेज:पुंज कर्तृत्वाने कालांतराने महाराष्ट्र दिपून गेला.

घरातील धार्मिक वातावरणात अण्णासाहेबांचे बालपण गेले. लहानपणापासूनच त्यांचा स्वभाव मृदुमुलायम होता. चांगल्या पुस्तकांचे वाचन करण्याची त्यांना आवड होती. नियमित अभ्यास त्याच बरोबर नियमित व्यायाम त्यांनी कधीच सोडला नाही. सन १८८१ साली प्रथम क्रमांकाने मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी कोल्हापूरला महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. सन १८८४ मध्ये अर्थशास्त्र व इतिहास घेऊन ते बी.ए. झाले. सन १८९० मध्ये वकिलीची परीक्षा ते पास झाले. साताऱ्यात वकिली सुरू करण्याआधी मुधोळ संस्थानात १८९१ मध्ये ते न्यायाधीश म्हणून रुजू झाले. त्यांनी तीन वर्ष हे पद सांभाळले. त्यानंतर त्यांनी साताऱ्यांत १८९४ मध्ये वकिली सुरू केली.

साताऱ्यात आल्यावर त्यांच्या समाजसेवेच्या कार्याला खऱ्या अर्थाने गती मिळाली. त्यांच्या सामाजिक कार्यकर्तृत्वाचा स्वयंप्रकाशित व ठसठशीत पैलू म्हणजे वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कंपनी. अण्णासाहेबांनी १९१३ मध्ये वयाच्या ४९व्या वर्षी या कंपनीची स्थापना केली. सन १९३५ साली सातारा येथे इन्शुरन्स कंपनीच्या नवीन वास्तूचा उद्घाटन समारंभ न्यायमूर्ती बाबासाहेब जयकर यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी त्यांनी असे गौरवपूर्ण उद्गार काढले की, ''आज येथे आल्याने मला एक अद्भूत व्यक्ती आणि संस्था यांचा परिचय झाला. ती व्यक्ती म्हणजे श्री. अण्णासाहेब चिरमुले व संस्था म्हणजे वेस्टर्न इंडिया विमा कंपनी''. या समारंभाचे वेळी प्रसिद्धी पराङ्मुख असलेले अण्णासाहेब मात्र अचानक कामासाठी मुंबईला निघून गेले होते.

विमा कंपनीकडे जमा होणारा विपुल पैसा इतरांच्या माध्यमातून गुंतविण्यापेक्षा तो व्यापार आणि उद्योगाकडे वळवता आल्यास जास्त फायदेशीर ठरेल असे विचारचक्र अण्णासाहेबांच्या मनात सुरू झाले. तथापि विमा व्यवसायाच्या कक्षेत व उद्देशात ते बसणारे नव्हते. म्हणून त्यांनी वयाच्या ७२व्या वर्षी म्हणजे १९३६ साली युनायटेड वेस्टर्न बँकेची स्थापना केली. बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी १९५१ पर्यंत म्हणजे वयाच्या ८८व्या वर्षापर्यंत अत्यंत समर्थपणे सांभाळली व बँक नावारुपास आणली. सन १९०७ मध्ये स्थापन केलेली सातारा स्वदेशी कमर्शियल बँक युनायटेड वेस्टर्न बँकेत विलीन करण्यात आली. विश्वस्त निधीचे आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी अण्णासाहेबांनी १९४६ मध्ये ''वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झिक्युटर कंपनी'' स्थापना केली. या संस्थेचे ते १९५१ पर्यंत अध्यक्ष होते. त्यांनी स्थापना केलेली आणखी एक लोकोपयोगी संस्था म्हणजे विमा मुद्रक आणि प्रसारक लि. अत्यंत साधी रहाणी व उच्च विचारसरणी हे अण्णासाहेबांचे ब्रीद होते. कृतीवर त्यांचा अधिक भर होता. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे सौजन्याची मूर्तिमंत खाण. त्यांचे जीवन कार्य, आदर्श, प्रत्येक पिढीस सदैव प्रेरणादायी आहे. वानगी दाखल येथे दोन घटनांचा उल्लेख करतो. विमा कंपनीच्या एका मिटींगमध्ये अण्णासाहेबांना गाडी द्यावी असा ठराव एकमताने मंजूर झाला. तथापि अण्णासाहेबांनी गाडीचा प्रस्ताव नम्रपणे नाकारला. व्यक्तिगत स्वरुपाच्या पत्राचा टपाल खर्च संस्थेला नको म्हणून टपाल हशीलाचे पैसे खिशातून देणारे अण्णासाहेब म्हणजे पराकोटीचे आदर्श व्यक्तिमत्व. त्यांनी घालून दिलेली ध्येय धोरणे, उच्च नितीमूल्यांची परंपरा आपण विस्मृतीच्या पडद्यामागे जाऊ देता कामा नयेत. ऋषितुल्य विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

**- श्री. स. ना. तथा बाळासाहेब भाटे**
**मो. ९४२२४०२६४९, सातारा.**

**VIDISHA**
**ENTERPRISES**


Tally Partner

**We provide all Services for Tally Accounting Software**

21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044

**Mob.** : +91-9970156307
**Tel.** : +91-20-27660748
**Email :** meghanathakur@yahoo.com

# आनंद स्वामी - श्रीपाद भिकाजी ताटके


आनंदस्वामी श्री. भि. ताटके


पत्नी सौ. शुभदा

दीड दिवसांचे गणपती घरी गेल्यावर श्री आनंदस्वामींना भेटण्याचे ठरले.

दुपारचे अडीच वाजले होते. भीत भीत आम्ही सौ. वसुधा ताटकेंच्या (आनंदस्वामींची मोठी सून) ब्लॉकची बेल वाजवली. चटकन् दरवाजा उघडला गेला. 'या', म्हणून प्रसन्न हसून सौ. वसुधाताईंनी आमचं स्वागत केलं. 'पाणी घ्या' म्हणून पाण्याचे लोटीभांडं समोर आणून ठेवलं. 'आलेच हं, म्हणून त्या आतल्या खोलीत गेल्या. तेवढ्यांत पांढरा लेंगा, पांढरा हाफ बुशशर्ट घातलेले आनंदस्वामी बाहेर आले. आम्ही उठून उभ्या राहिलो.

येण्याचे प्रयोजन मुलाखतीचे सांगितल्यावर स्वत:बद्दल माहिती सांगायला लागले. माझा जन्म ११ जुलै १९३३ चा मुंबई येथे झाला. पुणे, मुंबईत माझं प्राथमिक व पुढे एस.एस.सी पर्यंतच शिक्षण झालं. साहित्यप्राज्ञ झाल्यावर कॉलेजमध्ये नाव घातलं. पण घरच्या आर्थिक परिस्थितींचा आढावा घेतला आणि कॉलेजकडे पाठ फिरवली. बालपण खूप कष्टात गेलं. मात्र खाण्यापिण्याचे कधीही हाल झाले नाहीत. शिक्षण घेत असतांना आलेपाक, स्टेशनरी, रंगरांगोळी, सौंदर्यप्रसाधने, पातळे यांची घरोघर जाऊन विक्री केली आहे. इथे एक गोष्ट आठवते सांगण्यासारखी आम्ही पुण्यात सोमवार पेठेत, गोसावी वाड्यांत रहायला होतो. मी त्यावेळी ५-६ वर्षांचा होतो. आमच्या घरी शेजारी-पाजारी, पै-पाहुणा, नातेवाईक यांचं नेहमी येणंजाणं असे. शेजारच्या पंडितकाकू एकदा माझ्याकडे आल्या आणि मला म्हणाल्या, सदू, वासंतीचं लग्न जमत नाही, कधी होईल?

काकू काळजी, सोडा. येत्या नोव्हेंबर महिन्यांत दुसऱ्या आठवड्यात तिचं लग्न होईल आणि दयाघन प्रभूच्या कृपेने तसंच झालं. एकदा वाड्यातल्या विंचूरकर काकू माझ्याकडे आल्या आणि मला म्हणाल्या, 'सदू आमच्या मनोहरला कधी नोकरी लागेल?, पुढल्या महिन्यात!' त्याचं पत्र तयार आहे. आठ दिवसांत हातांत पडेल आणि प्रभुकृपेने तसंच झालं. हे मी कसं सांगत होतो ते मला सांगता येणार नाही! प्रश्न समोर आला की, त्याचं उत्तर आपोआप सुचत असे. देणे ईश्वराचे!

दरम्यान बऱ्याच नोकऱ्या झाल्या,

नंतर २३ वर्षांपेक्षा जास्त स्वत:ची 'अभिश पब्लिसिटी सर्व्हिस' ही जाहिरात कंपनी चालवली, वाढवली आणि 'श्री' ची आज्ञा होताच बंद केली. गाणगापूरच्या प.पू. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या कृपेने माझा जन्म झाला म्हणून माझं नाव 'श्रीपाद' ठेवण्यात आलं. वडीलांची आई माझी आजी ती बनूताई, श्रीस्वामी समर्थांची निष्ठावान उपासक, आई - ती. सौ. आनंदीबाई, शंकर आणि देवी उपासक, वडील- ती. श्री. भिकाजीपंत, दत्तावतार प.पू. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे ६५ वर्षांहून अधिक काळ कृपांकित. या साऱ्यांनी आपली अध्यात्मिक 'इस्टेट' मला दिली.

त्याशिवाय प. पू. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज अक्कलकोट निवासी श्री.स्वामी समर्थ प.पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंब्ये) स्वामीमहाराज प्रतिदिन मला सर्वार्थाने सांभाळतात. नित्य सूचना देतात. १९८५ साली अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थांनी तोंडी आदेश देऊन मला सांगितले, 'आजपासून तू आनंदस्वामी झालास!'

माझे आजवर २१ छोटे-मोठे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्यात संतचरित्र, गुरुचरित्राचे अनेक अध्याय, श्रीअन्नपूर्णा उपासना, श्रीलक्ष्मीव्रत, रोगनिवारणार्थ अध्यात्मिक, उपचार, सुखी, आनंदमय जीवन कसे जगाल? आदि ग्रंथांचा समावेश आहे.

माणगांव (सिंधुदुर्ग) हे प.पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंब्ये) स्वामी महाराजांचे जन्मस्थान आहे. तेथे डोंगरावर सिद्धमहापुरुषाची एक गुहा आहे. श्रीस्वामीमहाराज दररोज साधनेसाठी तेथे दिवसभर उपासनामग्न असत. ते थोडे दुर्गम स्थान आहे. आबालवृद्धांना तेथे नीट जाता येता यावे म्हणून श्री आज्ञेने तेथे सुमारे २७५ पायऱ्यांचे बांधकाम 'श्री'नी करवून घेतले. तसं गेली ३० वर्षे आम्ही सर्व साधक कार्यरत आहोत. मुख्य श्रीदत्त मंदिराभोवतालचे लादीकाम, झाडांचे विविध पार, पायऱ्या, ५ संडास-बाथरुम आदींचे बांधकाम, भक्तनिवास निर्मितीला अन्नदान सेवेला द्रव्य सहाय्य. श्रीनांदोडकरमहाराज स्मृतीमंदिराचे बांधकाम विविध विहीरींची स्वच्छता आदी कामे झाली आणि क्षेत्र विकासाची इतर कामे 'श्री' करवून घेत आहेत.

पान क्र. १३ वर

॥ रेशीम गांठी ॥ ®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समुपदेशन
वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे

## ''चांदण्याचे थवे'' – सौ. वैशाली हळबे

''चारोळ्या'' आणि ''चांदण्याचे थवे'' अशी दोन पुस्तके की, ज्यामध्ये ६१ कविता आणि ''चारोळ्या'' काव्य प्रकार वाचनांत आला. सौ. हळबे यांच्या कवितामधून नेमके सांगायचे झाल्यास सोपी व सरळ भाषा परंतु परिणामकारी आहे. त्यांच्या कविता उत्तम आहेतच शिवाय त्याच्याबद्दल त्यांचे विचार त्यांच्या स्वभावातील साधेपणा, त्यांच्या लिखाणातून जाणवतो त्या म्हणतात


''मी एक विनम्र वाचक आणि शब्दांची पूजक!
भावनांचा आदर आणि माणुसकीची कदर करावी!
अशी भावना! माणसा–माणसामधील नाती हळूवार
जपावीत, प्रेमाच्या देवघेवींनी जतन करावीत!''

''चांदण्यांचे थवे'' या काव्यसंग्रहातील दोन कविता खास ''संपर्क'' च्या वाचकांसाठी

**– संपादक**

### ''अस्तित्व''

काळोख गर्द वेणा, दिवसा विरुन गेल्या
सूर्यास जाग आली, दव पाकळीत ओल्या!
नभ चांदण्यात जेव्हां, उजळून मौन झाले
ते श्वास चंद्रम्याचे, अवघ्या दिशेत भरले!
स्वप्नस्थ सागराची, आवर्तमग्न वाळू
पृथ्वीस वाटले की, केसांत आज माळू!
शिवणीत पर्वतांच्या, पाषाणमग्न तुकडे
गर्भस्थ भावनांना, कुरवाळतात झाडे!
पाना फुलांत गंध, हसतो जरा–जरासा
सृष्टीस पावसाचा, मिळतो पुरा दिलासा!
हे विश्व प्रकाशमान, मानव्य–दीप तेज,
नाविन्य रोज येथे, आयुष्य हो सतेज।
अस्तित्व जाणिवांचे, उमले चराचरांत
चैतन्य गीत झरते, साऱ्याच जीवनांत.



### ''संदेश''

माझ्या हातातला दिवा
तू जन्मभर जतन कर
प्रकाशाने उजळून टाक
आयुष्याचे अंधार घर।
आठवणींच्या फुलामधला
गंध जपून ठेव।
निर्वाणाच्या वाटेवरती
सद्भावाचे फुटेल पेव।
आकाशातले पक्षी जरी
झोपी गेले घरट्यातून।
झाडे त्यांना संभाळतात
आपला जीव लावून
तुझ्या पंखाची भरारी
जावो क्षितीजा पल्याड।
अशाश्वतावरती शाश्वताची
रांगोळी तू काढ।
आता खरंच संपत आला
रात्रीचाही तिसरा प्रहर।
पहाटे–पहाटे झाडावरच्या
फुलांनाही येईल बहर!

**सौ. वैशाली हळबे, रत्नागिरी**
**मो. ९९७५५५१३८९**

## गावाकडची वाच्यता

**पान क्र. ७ वरून**

सर्वांची संमती घेणे क्रमप्राप्त असते.

अशावेळी बाहेर शहरात असेल तर त्या हिस्सेदार किंवा परदेशात आपल्या नवऱ्याबरोबर असलेल्या बहिणींची संमती मिळवणे जिकीरीचे होते त्यामुळे तेथील अर्धशिक्षित शेतकरी या सर्व जंजाळाला कंटाळून शासकीय योजना किंवा बँकेचे कर्ज घेण्यापेक्षा सावकारी पाशात अडकतो. ९० टक्के बहिणी भावाच्या मिळकतीतील हिस्सा मिळवण्यासाठी इच्छुक नसतात. परंतु अशांकडून तरी संमती पत्र घेऊन ७/१२ वरील नांव कमी करणे शक्य आहे. परंतु तेही घडतांना दिसत नाही.

शिक्षणाचीसंधी मिळालेला भाऊ नोकरी धंद्यावर बाहेर गांवी शहरात जातो व गांवी राहणाऱ्या शेतकरी भावाच्या उत्पन्नात हिस्सा मागतो. परंतु आपण केलेल्या मिळकतीमध्ये गांवच्या भावाला हक्क नाही असे मानून त्याच्यावर बळजबरीने किंवा कायदेशीर उपायाने उत्पन्नाचा हिस्सा हिसकावून घेतो त्यावेळी तेथील शेतकरी, भावाला ना सरकार ना आप्तेष्ट कोणीही संरक्षण देऊ शकत नाही. नोकरी करणाऱ्या भावाच्या गळ्यात ५० ग्रॅम गोफ तर बायकोच्या गळ्यात जाडजूड मंगळसूत्र असते पण शेतकरी भावाच्या बायकोच्या गळ्यात चांदीची डबली असलेली काळ्या मण्याची माळ अशा विषमतेमुळे आजचा तरुण गावांत राहून घरदार सांभाळणे व शेतीवाडी करणे पसंत करीत नाही. अशी आजची दैना झाली आहे. त्यामुळे गांवे ओस पडत असून, शहरात महापूर ओसंडून वहात आहे.

**– प्रभाकर चिं. प्रभुदेसाई**

## आनंद स्वामी – श्रीपाद भिकाजी ताटके

**पान क्र. १२ वरून**

जवळ–जवळ १४ महिने धोपेश्वराच्या जंगलात वास्तव्य केलं. अखेर.... अखेर मंदिर मूर्ति तयार झाली आणि 'श्रीं' नी आज्ञा केली. मंदिरावर एक मजला चढवा आणि तेथे श्रीयंत्राची स्थापना करा! 'श्रीं'च्या कृपेमुळे तेही काम संपन्न झालं. अवघ्या ८ महिन्यांत मूर्तिसह, श्रीदत्तमंदिर त्याच्या बाजूची १०० फूट बाय १३ फूट भिंत, श्रीयंत्र संपन्न झालं. एक वर्ष हे मंदिर सर्वार्थाने सांभाळून नंतर गांवकऱ्यांच्या ताब्यात दिलं. त्याला २४ लाख रुपये खर्च आला!

एक व्यक्ती आपल्या सहकार्याच्या मदतीने आणि श्रींचे आशिर्वाद पाठीशी असल्याने खूप कामे करतो, त्याचप्रमाणे सिद्धी प्राप्त झाल्याशिवाय कोणतीही गोष्ट सांगू शकत नाही. परंतु ईश्वराची असीम भक्ती केल्यामुळे, ही सिद्धी प्राप्त झाली. स्वामी समर्थांनी 'आनंदस्वामी' झाल्याची कृपा ज्यांचे हाती लागली आहे हे आनंदस्वामी यांचेशी वार्तालाप करून, मी माधुरी शेंबेकर, सौ.माणिक दीक्षित व सौ. मंगला खांडेकर अशा तिघीजणी स्वामींचा प्रसाद ग्रहण करून आनंदाने परतलो. आनंद स्वामींची भेट घेऊन जर आनंद प्राप्ती, समाधान मिळवावयाचे असेल तर खालील पत्त्यावर किंवा फोनवर संपर्क करावा.

**माधुरी शेंबेकर – मुलुंड, मो. ९८६९०४९३५२**

श्रीपाद (सदानंद) भिकाजी ताटके
तथा
आनंदस्वामी
२२/१४ डी, रानडे हायस्कूल जवळ,
झावबावाडी, मुंबई – ४००००२
फोन ०२२–२२०१९६६१

## सुनील जठार यांना राष्ट्रीय समता फेलोशिप पुरस्कार

**राजापूर** - येथील मनसेचे माजी तालुकाध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते सुनील जठार यांना नाशिक येथील युवाशक्ती सामाजिक संस्थेचा सन २०१४चा राष्ट्रीय समता फेलोशिप पुरस्कार जाहीर झाला आहे. युवाशक्ती सामाजिक संस्था आणि जमाते इस्लामी हिंद यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जानेवारी रोजी पंचवटी नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रफीक सैय्यद उपस्थित राहणार आहेत. सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जठार यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. श्री. जठार यांना यापूर्वीही विविध संस्थांचे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांना घोषित झालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## तो आहे कऱ्हाडे ब्राह्मण

जरी सोडले त्याने संध्या-पळी-ताम्हन,
पण त्याला लाभले आहे तेजाचे गगन.
नात्यात जपतो तो नेहमी आपलेपण,
गोतावळ्यात रमणारा तो आहे कऱ्हाडे ब्राह्मण!
जग कितीही बदलले तरी बदलत नाही, आपले मन.
इतरांच्यात मिसळतो, पण सोडत नाही मीपण
स्वत्व जपतो आणि इतरांचेही राखतो मन
आधुनिक ज्ञानविस्तारांचे, ठेवतो सजग भान
कष्टाने कमावतो विद्येचे धन, वित्ताचे कण
सार्थ अभिमान जागवत, जपतो आपला गण,
गोतावळ्यात रमणारा तो आहे कऱ्हाडे ब्राह्मण ।।
जुन्याबरोबर नव्याचाही धरतो ध्यास
सामाजिक जीवनाचा करतो, नित्य अभ्यास
मेळावे-संमेलनाचे घालतो, अधून-मधून घाट
तरुणांना देतो प्रोत्साहन, दाखवतो प्रगतीची वाट
उत्कर्षाच्या पहाटेचे गातो नव्याने गान
स्वप्न पाहतो, उज्वल भविष्याचे महान
उदारपणे उघडून देतो, आपल्या तिजोरीतला खण
सगळ्यांनाच आपल्याबरोबर नेतो कऱ्हाडे ब्राह्मण!

**- सौ. वैशाली हळबे**
**मो. ९४२२४०२६४९**
**रत्नागिरी**

## !!श्रद्धांजली!!



कोकणातील ज्येष्ठ भाषाशास्त्रज्ञ आणि यंदाच्या साहित्य अकादमीच्या पुरस्कार विजेत्या डॉ. माधवी सरदेसाई यांचे मडगांव येथे वयाच्या ५२व्या वर्षी कॅन्सरसारख्या दुर्धर अशा रोगाने दुःखद निधन झाले.

---

सुप्रसिद्ध गायिका सौ. सुमती टिकेकर यांचे ९०व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. प्रख्यात अभिनेते श्री. उदय टिकेकर यांच्या त्या मातोश्री होत आणि सौ. आरती अंकलीकर टिकेकर या सुप्रसिद्ध गायिका या त्यांच्या स्नुषा होत. वरील दोन्ही मान्यवरांना भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघातर्फे विनम्र श्रद्धांजली.




संस्थापक
कै. वासुदेव महादेव जावडेकर

सातारी पेढा शॉप
स्थापना-१९३६



मशहूर
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

चटकदार
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का
पौष्टीक खाद्य भांडार
अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर-440012, फोन : 0712-2525704

# 'इच्छापत्र' आवश्यक का व कसे?

आजपर्यंत इच्छापत्र (अथवा मृत्यूपत्र) हा शब्दसुद्धा काहीतरी अप्रिय अगर अशुभ असा लोकांना वाटे आणि त्याबद्दल साधी चर्चा करावयालाही कोणी उत्सुक नसे, याचे कारण कदाचित असे असेल की, ' इच्छापत्र' म्हटल्याबरोबर 'मृत्यू' या जीवनातील अटळ सत्याचीच आपोआप आठवण होते. हल्ली मात्र ही वृत्ती बदलत चालली आहे. आपल्या मृत्यूनंतर आपल्या सर्व संपत्तीचा योग्य तो विनियोग व्हावा असे जर आपल्याला वाटत असेल, तर इच्छापत्र करून ठेवणे हा एकच मार्ग आहे, हे लोकांना पटू लागले आहे. प्रत्येक माणसाला आपले इच्छापत्र करून ठेवण्याचा हा जो अधिकार आहे, ते त्यांच्या हातात दिलेले एक प्रभावीअस्त्र आहे, असे म्हणायला हरकत नाही.

'इच्छापत्र' म्हणजे काय? आपल्या मृत्यूनंतर आपल्या संपत्तीचा विनियोग कसा व्हावा, याबद्दल एखाद्याच्या मनात ज्या योजना असतील, त्या योजनांचा कायदेशीर जाहीरनामा (डिक्लरेशन)म्हणजे इच्छापत्र' असे म्हणता येईल. इच्छापत्र व त्यासंबंधीची कागदपत्रे ही अगदी खाजगी स्वरुपाची आणि गोपनीय असतात आणि ती कोठल्याही न्यायालयापुढे अगर अधिकाऱ्यापुढे हजर करण्याचा हुकूम इच्छापत्र करणाऱ्याला कोणीही देऊ शकत नाही.

**इच्छापत्राची वैशिष्ट्ये :**

इच्छापत्र या दस्तऐवजाची काही वैशिष्ट्ये असतात. एक तर त्यामध्ये सुचविलेल्या योजनांची अंमलबजावणी आपल्या मृत्यूनंतरच व्हावी अशा उद्देशाने ते तयार केलेले असते. दुसरे म्हणजे एकदा इच्छापत्र केले की ते कायमचे झाले, त्यात काही बदल करता येणार नाहीत असे नसते. बदलत्या परिस्थितीप्रमाणे त्यात कितीही वेळा बदल करता येतात अगर ते रद्दही करता येते. सहसा आपल्या संपत्तीचा विनियोग कसा व्हावा, हे वारसांना कळावे म्हणूनच इच्छापत्र केले जाते. परंतु, इस्टेटीचा व्यवस्थापक नेमण्याकरिता अगर एखादा विश्वस्त निधी उभारण्याकरिता अगर अज्ञान मुलांसाठी तात्पुरता (पुढे सज्ञान होईपर्यंत) पालक म्हणून कोणाची नियुक्ती करण्याकरिताही इच्छापत्र करता येते.

जेव्हां इच्छापत्र न करताच एखादी व्यक्ती मरण पावते, तेव्हां तिची सर्व संपत्ती त्या व्यक्तिच्या वारसांकडे जाते. कायदेशीर वारसांमध्ये सहसा अगदी निकटच्या कुटुंबियांचाच म्हणजे पत्नी अगर पती, मुले, आई-वडील, बहिण व भाऊ यांचाच समावेश होतो.

**इच्छापत्र करण्याची गरज काय?**

वर म्हणल्याप्रमाणे इच्छापत्र न केल्यास आपली संपत्ती आपल्या कायदेशीर वारसांमध्ये आपोआप वाटली जाते. परंतु, आपल्याला नेहमी असे वाटते की, आपल्या इच्छेनुसार आपल्या संपत्तीचा विनियोग व्हावा. (पुष्कळ वेळा सगळ्या वारसांची सांपत्तिक स्थिती सारखी नसते. एखाद्याला आधाराची जास्त गरज असते. अगर कुटुंबातील एखाद्या अपंग व्यक्तिसाठी तरतूद करून ठेवणे जरूर असते. म्हणून प्रत्येक वारसाला त्याच्या गरजेनुसार आपल्या संपत्तीचा वाटा मिळावा असे वाटते.) म्हणूनच इच्छापत्र करून ठेवणे जरूर असते. याखेरीज इच्छापत्र करण्याचे पुढीलप्रमाणे काही फायदे असतात :-

१. इच्छापत्र न करता एखाद्या व्यक्तिचा मृत्यू झाला तर वारसांच्या मनात संभ्रम निर्माण होतो की 'मृत व्यक्तिची इस्टेट' या नावाखाली काय काय गोष्टींचा समावेश होतो अगर मृत व्यक्तिने आपल्या इच्छा कोणाला सांगितलेल्या आहेत कां? इच्छापत्राच्या रुपात काही ठेवले आहे का, वगैरे.

२. इच्छापत्रावरून त्या व्यक्तिची त्याच्या नातेवाईकांशी नाती कशी होती, त्यांची मते, विचार काय होते हे स्पष्ट होते. कारण इच्छापत्रात या सगळ्यांचे प्रतिबिंब पडते.

३. संपत्तीचे वाटप कसे व्हावे यासंबंधी स्पष्ट आदेश इच्छापत्रात असले तर भांडणे, वाद टाळता येतात अगर मिटवता येतात.

४. इच्छापत्र केलेले नसल्यास कायद्याप्रमाणे वारसांमध्ये संपत्तीचे वाटप होते हे खरे, पण एखादी विधवा झालेली मुलगी अगर आजारी मुलगा अगर अपंग झालेले आई-वडील यांच्या विशेष गरजा कायद्याच्या चौकटीत बसत नाहीत. कायद्याला सर्व सारखेच. परंतु, इच्छापत्र केले की, अशा व्यक्तिंची आपल्याला खास व्यवस्था करता येते. शिवाय एखादा इमानदार नोकर, एखादी सेवाभावी परिचारिका, एखादा जिवलग मित्र यांना आपल्या संपत्तीतून काही द्यावे असे वाटले, तर ते इच्छापत्राद्वारा करता येते.

५. जर इच्छापत्र केलेले नसेल, तर घरातून भांडून बाहेर पडलेला एखादा चंगीभंगी मुलगासुद्धा बापाच्या संपत्तीतला आपला वाटा मागू शकतो.

**इच्छापत्र कोणाला करता येते?**

हिंदू वारसा कायद्याच्या ५व्या कलमानुसार जी मनाने निरोगी आहे (वेडी वगैरे नाही) अशी कोणीही सज्ञान व्यक्ती इच्छापत्र करून आपल्या संपत्तीचा विनियोग करू शकते. सज्ञान म्हणजे १८ वर्षे पूर्ण अगर जास्त वय असलेली व्यक्ती, विवाहित स्त्रीलाही आपले इच्छापत्र करता येते. मात्र तिच्या हयातीत 'तिची स्वत:ची' अशी म्हणून जी मालमत्ता अगर संपत्ती तिला वेगळी करता येत असेल, तेवढ्याच इस्टेटीची अगर संपत्तीचे ती इच्छापत्र करू शकते.

इच्छापत्राने कशाचा विनियोग करता येतो?

ज्या स्थावर अथवा जंगम इस्टेटीवर त्या माणसाचा अधिकार आहे, जी त्याच्या स्वत:च्या मालकीची आहे, अशी कोठलीही संपत्ती अगर मालमत्ता इच्छापत्राद्वारा वारसांना देता येते. आपल्या हयातीत इच्छापत्राने कोठल्याही इस्टेटीच्या भागावरचा आपला हक्क दुसऱ्या कोणाला देता येत नाही. हिंदु अविभक्त कुटुंबाची जी मालमत्ता असेल, तिच्यातील स्वत:च्या वाट्याचा विनियोग त्या व्यक्तिला इच्छापत्राद्वारा करता येतो. १९५६ सालच्या हिंदू वारसा आणि पोटगी कायद्यान्वये कोठल्याही व्यक्तिवर अवलंबून असणाऱ्या वृद्ध, अपंग अगर अज्ञान वारसांचा पोटगीचा हक्क मात्र इच्छापत्र करून नाकारता येत नाही. इच्छापत्रात त्यांच्या नावाने इस्टेटीतील काहीही ठेवलेले नसले तरी मृताच्या इस्टेटीमधून पोटगी मागण्याचा त्यांना हक्क आहे.

इतर अनेक दस्तऐवजांशी तुलना करता **पान क्र. २२ वर**





**अश्रु येणं हे माणसाला हृदय असल्याचं द्योतक आहे.**


**पाककृती**
**प्रथिनयुक्त रूचकर पदार्थ**

## उच्च प्रथिनयुक्त पराठा

**साहित्य –**

अर्धी वाटी हिरवे मूग
अर्धी वाटी राजमा
अर्धी वाटी मिश्रपीठ
अडीच वाट्या कणिक
अर्धी वाटी सोया चंक्स
अर्धी वाटी पनीर,
लसूण, मिरची, कोथिंबीर, मीठ,
चाट मसाला, पिठी आणि तेल.

कृती – सर्व कडधान्ये रात्री भिजवा. सोया चंक्स सकाळी १५ ते २० मिनीटे गरम पाण्यांत भिजवा. मिक्सरमधून सोया चंक्स आणि मसाला वाटून घ्या. भिजवलेली सर्व कडधान्ये कुकरमध्ये शिजवून घ्या. सोया चंक्स शिजवलेली कडधान्ये, पनीर, मसाला, चाट मसाला, मीठ घालून सर्व एकत्र करून गोळे करून घ्या. कणिक मिश्रपीठ, मीठ व तेल घालून थोडी सैल भिजवा. उंडा करून मिश्रणाचा गोळा भरा व तोंड बंद करा. पिठीवर हलक्या हाताने लाटा. तव्यावर थोडे तेल टाकून दोन्ही बाजू चांगल्या परता आणि चटणीसह सर्व्ह करा!



## कांदा पराठा

**साहित्य –**

एक वाटी कणिक
अर्धी वाटी मिश्रपीठ
दोन कांदे
लाल तिखट,
मिरची, कोथिंबीर,
ओवा, मीठ, साखर, तेल.

कृती – कांदे किसून ते थोड्या तेलावर दोन मिनीटे परता. त्यामध्ये ओवा, किंचित साखर थोडेसे लाल तिखट, चवीनुसार मीठ, मिरची व बारीक चिरलेली कोथिंबीर घाला.

कणिक व मिश्रपीठ दोन चमचे तेल घालून आणि थोडे पाणी घालून सैलसर भिजवा. दोन पातळ पाऱ्या करून त्यामध्ये कांद्याचे सारण भरा व कडा बंद करा व पिठीवर हलक्या हाताने थोडेसे लाटा दोन्ही बाजू थोड्या तेलावर परतून घ्या.

तयार कांदा पराठे चटणी सॉस सह सर्व्ह करा.


**।।श्री।।**
**स्थापना : गणेश चतुर्थी १९९३**
**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा**
**प्रकाश जठार यांचे**

# ज्योती एन्टरप्रायझेस

**(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)**

**पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर, गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,**
**फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२**

# With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI SINCE 1960

**An ISO 9001 : 2008 Certified Company**

PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**Address**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390 Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664 E-mail: phibgm@gmail.com

**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.



DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10

Fabricated Parts
Manifold Exhaust, Silencers, Pipe bends, Air Cleaner Assembly etc..



**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.



(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450

OKUMA HMC
MA-600 HB



HAAS TURNING CENTRE



HAAS VMC
VF3YT



**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

## MACHINERY AT PHI

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)

## MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.

# रत्नागिरी संघातर्फे पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न

रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सह. संघामार्फत दरवर्षी पुरस्कार आणि गुणवत्ता पारितोषिकांचे वितरण करण्यात येते. यावर्षी हा कार्यक्रम रविवार दि. २३/११/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता संघाच्याच राणी लक्ष्मीबाई सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात वेदमंत्रांच्या घोषात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत उद्धव हळबे यांनी कार्यक्रमासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे, पुरस्कारित्यांचे आणि उपस्थित सर्व विद्यार्थी आणि पालक, सभासद यांचे स्वागत आणि प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. श्री. विद्याधर करंदीकर यांचा परिचय आणि त्यांचा संघाच्या अध्यक्षांमार्फत सत्कार करण्यात आला. त्यांचा सत्कार केल्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. करंदीकर यांच्या हस्ते डॉ. श्री. भास्कर रामचंद्र करमरकर, रत्नागिरी यांना 'धन्वंतरी' पुरस्कार देऊन, श्री. दिनेश रामकृष्ण गुणे, देवरुख यांना 'दर्पण' पुरस्कार देऊन, सौ. स्नेहा चारुदत्त नाखरे, राजापूर यांना आचार्य नारळकर पुरस्कार देऊन आणि ह.भ.प. श्री. वासुदेवशास्त्री बाळकृष्ण पकाशकर, कुडाळ यांना आदर्श कीर्तनकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार वितरणानंतर सर्व पुरस्कारित्यांनी आपापली मनोगते व्यक्त केली.

पुरस्कार वितरण झाल्यावर इ. ४थी, ७वी स्कॉलरशीप, इ. १०वी, १२वी, पदवीधर यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवत्ता पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. याच कार्यक्रमात संघाच्या वसतिगृहाचे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री कै. बाळ गंगाधर तथा बाळासाहेब खेर छात्रालय असे नामकरण करण्यात आले. सर्वात शेवटी आपल्या भाषणात श्री. विद्याधर करंदीकर आश्रमव्यवस्थेवर बोलतांना म्हणाले. भारतीय संस्कृतीमध्ये ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम अशा चार आश्रमव्यवस्थेद्वारे संतुलन राखले गेले होते. मात्र गेल्या काही वर्षात ही व्यवस्था खिळखिळी झाली आहे. वृद्धाश्रम आणि घरात कोणी नाही म्हणून मुले सांभाळण्यासाठी पाळणाघरांची निर्मिती झाली आहे. हा एक सामाजिक आजार आहे.

मालिकांमध्ये आश्रमव्यवस्था किती ढासळली आहे त्याचे वारंवार दर्शन होते. स्त्रियांची भूमिका अनावर आणि पुरुष व्यसनी आणि मुले दीड शहाणी होत आहेत. भारतीय संस्कृतीने वर्णव्यवस्था आणि आश्रमव्यवस्थेद्वारे समाजाला स्थैर्य दिले होते. आता ब्रह्मचर्य आणि वानप्रस्थाश्रमावर गृहस्थाश्रमाचे अतिक्रमण होत आहे. दिवसेंदिवस ब्रह्मचर्य बाराव्या वर्षापासूनच नाहीसे होते आहे. मोबाईलच्या वापराचे प्रमाण वाढत आहे. या सर्वात बदल होणं गरजेचं आहे. किशोरवयीन मुलांमध्ये संतुलीत आहार, संयमीत आचरण आणि निरामय आयुष्यासाठी व्यायाम यांचे महत्त्व वाढवण्यासाठी शिक्षक, पालक या सगळ्यांकडून प्रयत्न होणं गरजेचं आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाच्या वसतिगृहातील विद्यार्थी चैतन्य आचार्य याने तर आभारप्रदर्शन श्री. मिलींद आठल्ये यांनी केले.

## 'इच्छापत्र' आवश्यक का व कसे?

**पान क्र. १९ वरून** इच्छापत्र तयार करणे ही फारशी कठीण व गुंतागुंतीची गोष्ट नाही. कारण एकतर इच्छापत्र काय करावे हे त्या त्या व्यक्तिच्या मर्जीवर असते (त्यावर इतरांचा दबाव नसतो) आणि दुसरे म्हणजे इच्छापत्राची नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावे लागत नाही अगर त्यावर मुद्रांक शुल्क भरावे लागत नाही. इच्छापत्र हे स्पष्ट शब्दांत, त्याच्या अर्थाबद्दल काहीही संदेह राहणार नाही अशा तऱ्हेने लिहावे लागते. ते लिहितांना अगदी औपचारिक भाषा वापरण्याची गरज नसते. ज्याचे इच्छापत्र केलेले आहे, त्या व्यक्तिने स्वत: अगर त्या व्यक्तिने ज्याला सही करण्यास सांगितले आहे. त्या व्यक्तिने सही केली आणि कमीत कमी दोन साक्षीदारांनी तरी त्यावर आपली सही केली म्हणजे इच्छापत्र पूर्ण झाले असे मानतात.

जे लोक इच्छापत्रावर साक्षीदार म्हणून सही करतात, त्यांना इच्छापत्रातील मजकूर माहिती असायलाच पाहिजे असे नाही. मात्र साक्षीदारांच्या समोर, त्यांच्या डोळ्यांदेखत, इच्छापत्र करणाऱ्याने इच्छापत्रावर स्वत:ची सही करावयास पाहिजे. इच्छापत्र करणाऱ्याच्या इच्छेनुसारच इस्टेटीचे वाटप (त्या व्यक्तिच्या मृत्यूनंतर) होईल ही खात्री असावी म्हणून इच्छापत्रामध्येच एक व्यवस्थापक (एक्झिक्युटर) नेमावा लागतो.

इच्छापत्र अगदी नाममात्र शुल्क भरुन रजिस्ट्रारच्या कार्यालयात नोंदणी करता येते. परंतु, इच्छापत्र करणाऱ्यास व साक्षीदारांना रजिस्ट्रारच्या ऑफिसमध्ये जाऊन त्यांनी त्या इच्छापत्रावर सह्या केल्याचे मान्य करावे लागते. इच्छापत्राचा खरे-खोटेपणा हा नोंदणी करण्यावर अवलंबून नाही. केवळ इच्छापत्र नोंदणी केले आहे म्हणून ते खरे आहे अथवा नोंदणी केले नाही म्हणून ते खरे नाही, असे कोर्ट मानत नाही. मृत्यूपत्र करणाऱ्याच्या मृत्यूनंतर कोणासही त्याची प्रत नोंदणी कार्यालयातून मिळू शकत असल्याने त्याची गोपनीयता राहणे कठीण जाते.

**इच्छापत्रासाठी व्यवस्थापकाची नेमणूक**

इच्छापत्र करणे सोपे असते परंतु, त्या इच्छापत्राची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी व्यवस्थापक (एक्झिक्युटर) नेमणे तितके सोपे नसते. कोठल्याही एकाच व्यक्तिला व्यवस्थापक म्हणून नेमले तर व्यक्ती कितीही चांगली आणि विश्वासार्ह असली तरी तिच्याही काही मर्यादा अगर अडचणी असतात आणि म्हणून व्यवस्थापक म्हणून काम करण्याची त्या व्यक्तिची काही वेळा तयारी नसते अगर त्या कामाकरिता लागणारा वेळ आणि श्रम तिला खर्च करता येत नाहीत आणि समजा, जरी एखादी व्यक्ती एकट्याने जबाबदारी घ्यावयाला तयार असली, तरी तिला प्राप्तीकर भरण्याकरिता योग्य त्या वकिलांना नेमावे लागेल. इच्छापत्र खरे आहे हे सिद्ध करण्याकरिता आणि त्या इस्टेटीबद्दल जर काही दावे वगैरे कोर्टात असले, तर ते लढण्याकरिता दुसऱ्या वकिलांची मदत घ्यावी लागेल.

**संग्राहक - श्री. गोपाळ भाटवडेकर, पुणे.**

# गूढरम्य 'देवीहसोळ'

## अमोल पाध्ये

मध्यंतरी काही दूरचित्र वाहिन्यांवरून तसेच वृत्तपत्रांतून '२०१२ साली पृथ्वी नष्ट होणार' अशा स्वरूपाच्या बातम्या झळकल्या होत्या; असे भाकित ज्या लोकांनी केले त्या लोकांनी एका गूढ मानव वंशाच्या कॅलेंडरसदृश्य दर्शिकेचा आधार घेतला. त्या दर्शिकेला 'माया कॅलेंडर' म्हणतात. मध्य व दक्षिण अमेरिकेत सातेक हजार वर्षांपूर्वी टॉलटेक, अॅझटेक व माया या तीन संस्कृती नांदत होत्या. या जमातींमध्ये 'माया' लोकं अधिक प्रगल्भ, प्रगत आणि खगोल गणितात पारंगत होती. दक्षिण अमेरिकेतील होंडुरास नावाच्या देशात माया संस्कृतीचे अवशेष आढळून येतात. माया लोकांकडे कालगणनेची अचूक पद्धती होती. पृथ्वी आणि शुक्र या दोन ग्रहांच्या परिभ्रमण कालांचा अचूक मेळ साधून माया लोकांनी जवळपास सहा कोटी चाळीस लाख वर्षांचे अचूक गणित ठेवले आहे. कोणतीही साधने नसताना त्यांनी सौर वर्ष ३६५.२४०० दिवसांचे असते, याची नोंद केलेली आहे. मात्र माया लोक तीसऐवजी वीस दिवसांचे तेरा महिने गृहित धरून कालगणना करीत. या सर्वांची नोंद विविध ठिकाणी मोठ्या शिळांवर खोदून ठेवलेली आढळते. अशीच परिस्थिती दक्षिण अमेरिकेतल्याच पेरू व बोलिव्हिया देशांच्या सीमेवर असलेल्या 'नाझका' पठारावरही आहे. येथे निवास करणाऱ्या 'इन्का' जमातीच्या लोकांनी ३७ मैल लांब व २ मैल रूंद अशा फरसबंदीची रचना खडकात खोदून काढलेली आहे. एवढेच नाही तर विविध आकाराच्या धावपट्ट्यांसारखी रचना, अॅन्डीज पर्वतावरील महाकाय त्रिशूळाची रचना, अजस्त्र फुलासदृश्य रचना आदी इन्का जमातीच्या लोकांनी खडकात कोरलेल्या आहेत. 'इन्का' साम्राज्याच्या सर्व खुणा युनेस्कोने, जागतिक वारसा घोषित केलेल्या आहेत. त्या बघायला लक्षावधी लोक पेरू, होंडुरास आदी देशात जात असतात. पाच-सात हजार वर्षांपूर्वी कोणतेही प्रगत तंत्रज्ञान किंवा अभियांत्रिकी उपकरणे उपलब्ध नसताना, इतक्या मोठ्या आकृत्या, इतकी अचूक कालगणनेची पद्धत व विकसित केलेले ज्ञान हा एक अगम्य व गूढ विषयच आहे. आजही अनेक शास्त्रज्ञ व विद्यापीठे यांचा अभ्यास करून नवनवीन निष्कर्षापर्यंत पोहोचत आहेत. इन्का व माया लोक इतकंच करून थांबले नाहीत, तर त्या काळी असलेल्या विविध प्राण्यांचाही त्यांनी योग्य वापर करून त्यांचा गूढ कालगणनेसाठी उपयोग करून घेतला आहे. हे सर्व विषद करण्यामागे एकच उद्देश आहे. तो म्हणजे अगदी अशीच गूढ शिल्पे व खडकातल्या आकृती आपल्या महाराष्ट्रात आहेत. ज्या अगदीच उपेक्षित व नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.



**देवीहसोळ गावाचे मूळ नाव हसोळ. कर्नाटकातल्या अंकोला गावातली श्रीआर्यादुर्गा भक्ताला पावून इथपर्यंत येऊन राहिली, म्हणून गावाचे नाव 'देवीहसोळ' पडले. मुचकुंदी ऋषींचा वारसा असलेल्या मुचकुंदी नदीच्या किनारी बसलेले हे गाव असून भालावली व भू या दोन मोठ्या गावांच्या मधोमध एका विस्तीर्ण पठारावर आहे. याच पठारावर, माया कॅलेंडरशी साम्य दाखवणारे सर्पयंत्र, गूढ ग्रहमाला, प्राणी, पक्षी, अजस्त्र विहीर आणि पुरातन चित्रलिपीतील शिलालेख अस्तित्वात आहेत.**

कोकणातील रत्नागिरी तालुक्यातील गावडेवाडी, कसोप, गावखडी तसेच राजापूर तालुक्यातल्या देवीहसोळ गावात माया कॅलेंडर व माया इन्का काळातल्या मानवी चेहऱ्यांची शिल्पे तसेच सर्प आदी प्राण्यांची अगदी तशीच साधर्म्य दाखवणारी रेखाटने उपलब्ध आहेत. यापैकी उल्लेखनीय म्हणजे गावडेवाडी आणि देवीहसोळ. निवळी फाट्याजवळ असलेल्या गावडेवाडीत विविध मानवी चेहरे आणि तत्सम आकृत्या असलेली शिल्पे पठारावरील जांभ्या दगडात कोरलेली आहेत. हे मानवी चेहरे जगातील विविध मानव वंशांप्रमाणे कोरलेले असून इतक्या पुरातन काळी हे ज्ञान कसे मिळाले असावे, हे गूढ आहे. खाणकाम व उपेक्षेमुळे ती जवळ जवळ नष्टच होत आलेली आहेत; परंतु राजापूर तालुक्यातल्या राजापूरपासून १८ कि.मी.वर असलेल्या देवीहसोळ गावी काही खुणा उत्तम रितीने टिकलेल्या आहेत. योग्य निगा राखल्यास बराच काळ टिकू शकतात.

देवीहसोळ गावाचे मूळ नाव हसोळ. कर्नाटकातल्या अंकोला गावातली श्रीआर्यादुर्गा भक्ताला पावून इथपर्यंत येऊन राहिली, म्हणून गावाचे नाव 'देवीहसोळ' पडले. मुचकुंदी ऋषींचा वारसा असलेल्या

मुचकुंदी नदीच्या किनारी बसलेले हे गाव असून भालावली व भू या दोन मोठ्या गावांच्या मधोमध एका विस्तीर्ण पठारावर आहे. याच पठारावर माया कॅलेंडरशी साम्य दाखवणारे सर्पयंत्र, गूढ ग्रहमाला, प्राणी, पक्षी, अजस्त्र विहीर आणि पुरातन चित्रलिपीतील शिलालेख अस्तित्वात आहेत.

यातील महत्त्वाचे घटक म्हणजे सर्पयंत्र आणि विहीर. हे सर्पयंत्र २० बाय २० फूट आहे. यंत्राचे शिल्पकाम अत्यंत रेखीव व प्रमाणबद्ध आहे. विशेषत: आजूबाजूला लाल जांभा दगड असताना सर्पयंत्राचा रंग काळसर तपकिरी आहे. हे शिल्पकाम हत्यारांनी खोदून काढण्यापेक्षा साचा ठेवून एम्बॉस केल्यासारखं वाटते. मुळात जांभा दगड अतिशय ठिसूळ. त्यात असं काम तडा न जाता, न तुटता हजारो वर्षे टिकतं, हे गूढ विशेषच मानावे लागेल. या सर्पयंत्रात मुख्य चार चौकोन आहेत. बाजूने एका अजगरासारख्या सापाने कलात्मक पद्धतीने विळखा घातलेला आहे. या चार चौकोनात प्रत्येकी १२ चौकोन असून त्यातही वेगवेगळ्या सर्पाकृती आहेत. सर्व अगदी सुस्पष्ट आहे. मधोमध एक वीत व्यासाचे छिद्र असून त्यावर वरवंटा ठेवून बंद केलेले आहे. या सर्पयंत्राची दिशा पूर्व–पश्चिम असून मधून एक साप पूर्वेकडून पश्चिमेकडे जात यंत्राची विभागणी करतो. यंत्राच्या उत्तरेला माळरान आणि दक्षिणेला देवी मंदिर आणि अतिप्राचीन स्मशान आहे. धो धो पावसातही यंत्रावर फार क्वचित परिणाम होतो. पावसाळ्यात संपूर्ण माळावर गवत उगवतं; पण यंत्रावर उगवत नाही. इतके आखीव, रेखीव व सुबक यंत्र आणि भोवताली असलेले मंदिर व इतर बांधकाम अगदी साधे आहे. याचाच अर्थ मंदिराच्या कारागिरांनी हे शिल्प बनवलेले नाही. एक शास्त्रीय पद्धत आहे. ज्यामुळे अशा गोष्टींचे सामान्य आयुष्य मोजता येते. त्याला कार्बन १४ पद्धत म्हणतात. कार्बन १४ पद्धतीने कालमापन केले; तर हे शिल्प किमान ४ ते ५ हजार वर्षांपूर्वीचे असावे, असे दिसून येईल. त्यामुळेच गूढ वाढत जाते. सदर यंत्राचे जवळ एक पक्षी, एक हत्ती व काही वेगळ्या प्रकारचे प्राणीही कोरलेले आहेत. हे प्राणी पृथ्वीतलावरचे वाटत नाहीत. तसेच एका बाजूला ग्रहमालाही खोदलेली आहे. या ग्रहमालेला स्थानिक लोक 'अब्दागिरी' समजतात. मात्र लक्षपूर्वक पाहिले असता, आपल्या ग्रहमालेशी साम्य दाखविणारे रेखाटन दिसून येते. या सर्पयंत्राचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दिवसाच्या वेगवेगळ्या प्रहरात त्यात रंगबदल दिसून येतो. सर्पयंत्रावर होकायंत्र दिशाहिन होते. मोबाईलची रेंज सर्पयंत्राबाहेर कमी तर आतमध्ये पूर्ण येते. सर्पयंत्राच्या मधोमध असलेल्या छिद्रातून किरणोत्सार होत असल्याची किंवा त्यातून विद्युत चुंबकीय लहरी निघत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सर्पयंत्राच्या थोडं पुढे गेल्यावर उजवीकडे उतारावर एक अतिप्राचीन विहीर आहे. विहीरीचे खोदकामही जांभ्या दगडातले आहे. विहिरीला २५ पायऱ्या आहेत. ढोबळमानाने तिचा आकार शिवपिंडीसारखा आहे. दिशा मात्र दक्षिणोत्तर आहे. पावसाळा वगळता तिच्यात केवळ दीड फूट पाणी असते. ही पातळी कायम असते. ती कधीच आटत नाही. विहिरीचे पाणी गोड आहे व देवी मंदिरासाठी वापरले जाते. या विहिरीचे वैशिष्ट्य म्हणजे तब्बल २५ फूट खोल खोदलेल्या या विहिरीचा डेब्रीस, ढिगारा आजूबाजूला अगदी दोन–तीन कि.मी. परिसरातही दिसत नाही. विहिरीचा मध्य भाग जवळपास दहा टनाचा असून त्याला कुठलाही आधार देणारा खांब नाही. विहिरीचा मुख्य भाग जसाचातसा कापून काढलेला असून तो आसपास कुठेही दिसत नाही. विहिरीत खाली उतरून बघितले असता कुठेही कोन व अंश न चुकलेला चौकोन दिसतो. पायऱ्यांची रचनाही वेगळी आहे. वरच्या बाजूला मोठ्या असलेल्या पायऱ्या तळापर्यंत जाता जाता लहान होत जातात. आणखी एक विशेष बाब म्हणजे विहिरीत खोदून काढलेले त्रिशूळ, ज्यांनी ही विहीर बनवली त्यांचीच ही खूण असण्याची दाट शक्यता आहे. स्थानिक लोक तिला पांडवकालीन मानतात. याबाबत अधिक संशोधनाची गरज आहे. या विहिरीत झऱ्याचे पाणी अव्याहतपणे वाहत असते. तरीही तिची पातळी वाढत नाही किंवा कमीही होत नाही.

या विहिरीच्या सरळ रेषेत सर्पयंत्राच्या दक्षिणेला पाच–सातशे वर्षांपूर्वीचे स्मशान आहे. हे स्मशानही गूढच आहे. स्मशानातील थडगी त्यांची रचना आणि दिशा बघता त्यांचे काही वेगळे प्रयोजन असू शकते. कुठल्याही थडग्यावर मृतकाचे नाव नाही वा इतरही उल्लेख नाही. गावातील लोकांचे पूर्वज असल्याचे ज्ञात नाही. मग हे स्मशान नक्की स्मशानच आहे की वेगळे काही, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

आता ज्या आर्यादुर्गा देवीमुळे गावाला देवीहसोळ नाव पडले तिच्याविषयी जाणून घेऊ. श्रीआर्यादुर्गेचे मूळ स्थान कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे आहे. फार वर्षांपूर्वी हसोळ गावातले पळसुले देसाई नित्यनेमाने अंकोल्यास पायी दर्शनाला जात.





आता पुन्हा महत्त्वाच्या विषयाकडे वळूया. या सर्व गोष्टी ऐकून देवीहसोळविषयीचे गूढ वाढतच जाते. ज्या माळावर आजही कुणी राहात नाही किंवा राहिल्याच्या खुणाही नाहीत. त्या ठिकाणी सर्पयंत्र, विहीर आदींचे प्रयोजन काय? सर्पयंत्रातून विद्युत चुंबकीय लहरी किंवा किरणोत्सार बाहेर पडतो काय? आजूबाजूला लाल दगडात काळे सर्पयंत्र कसे? सर्पयंत्र पश्चिमेकडे दिशादर्शन करून नक्की काय दाखवतंय? माया व इन्का संस्कृतीचे अवशेषही खंडाच्या पश्चिमेकडे आणि समुद्रांपासून दहा ते पंधरा कि.मी.च्या आसपास आहेत. असंच साम्य देवीहसोळच्या सर्पयंत्र व इतर आकृत्यांशी कसं? येथूनचं थोडं पुढे चालत गेले असता, गावाकडे उतरताना वेगवेगळ्या प्राण्यांच्या आकृत्या कातळावर कोरलेल्या आहेत. गावकऱ्यांकडे याबाबत माहिती नाही किंवा तत्संबंधी कुठलीही गावरहाटही नाही. मग या सर्वांचे प्रयोजन काय? सर्पयंत्राविषयी गावकऱ्यांचे अनुभवही गूढ आहेत. मध्यंतरीच्या काळात पुण्यातील काही संस्था संशोधन करून गेल्या; पण पुढे काय झाले, ते अज्ञात आहे. आधीच गूढ आणि अज्ञान, त्यामुळे या सर्वांचे संरक्षण होत नाही. योग्य प्रकारे निगा राखली जात नाही. पुरातत्व खात्याने व संबंधित संस्थांनी यावर अधिक संशोधन करणे गरजेचे आहे. जवळपास फलक लावून, जुजबी माहिती देऊन, संगोपनाचे निर्देश दिले पाहिजेत. अशा वस्तू इतर ठिकाणी जागतिक वारसा होतात; पण महाराष्ट्रात महाउपेक्षित होतात व नष्ट होतात. हे आता थांबवायला हवं. यावर अधिक संशोधन झालं तर खगोलीय दृष्टीने तसेच मानव उत्क्रांतीबद्दल काहीतरी नवे निष्पन्न होईल. ही सर्व रेखाटने आजतागायत निर्जन असलेल्या ठिकाणीच नक्कीच कुठल्या तरी प्रयोजनानेच तयार केलेली आहेत; पण योग्य देखभालीविनाही गूढच राहातील व कालौघात नष्ट होतील.

कठीण प्रवास आणि वयोमानपरत्वे जाणे कठीण झाले. त्यामुळे अखेरचे वेळी त्यांनी देवीस मनोमन प्रार्थना केली. देवीने त्यांना दृष्टांत दिला व सांगितले की, यापुढे तुला येथे येण्याची जरूरी नाही. मीच तुझ्यासोबत येते. मात्र मागे वळून पाहायचे नाही. मजल-दरमजल करीत देसाई गावापर्यंत आले. माळावर येताच देवीच्या पैंजणाचा आवाज थांबला व हर्षोल्हासाने पळसुलेंनी मागे पाहिले असता आर्यादुर्गेने त्यांना दर्शन दिले व अंतर्धान पावली. तिथेच कातळावर तिच्या पाऊलखुणा उमटल्या. कालांतराने त्याचेवर देऊळ उभारले गेले व नित्यनेमाने गावकरी आजतागायत पूर्जाअर्चा करत आहेत.

दरवर्षी मार्गशीर्ष वद्य अष्टमीला जवळच्या भालावली गावातील आर्यादुर्गेची बहीण श्रीनवदुर्गा वाजतगाजत तिला भेटायला देवीहसोळला येते. रात्री तिचा गावातला प्रवेश सर्पयंत्रावर होतो. तिथे असलेल्या छिद्रातून पुजारी हात घालून फुरसं (एक विषारी साप) काढतो व देवीवर ओवाळून पुन्हा आतमध्ये सोडतो. या दिवशी हा विषारी साप दंश करत नाही. गूढरित्या गेल्या दहा वर्षांपासून साप मिळत नाही. मात्र जत्रेचं हे एक मुख्य आकर्षण असते. त्यानंतर नवदुर्गा, आर्यादुर्गेला भेटायला देवळात जाते व रात्रभर मुक्काम ठेवून दुसऱ्या दिवशी परतते.

***

# हास्ययोग

**हास्य ज्याच्या घरी**
**आरोग्य तेथे वास करी ।**

याप्रमाणे हास्याचे महत्त्व आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात हसू हरवल्यासारखं झालं आहे. त्यासाठी मुद्दाम या भागाचा समावेश करण्यात आला आहे.

**हास्यामागचे शास्त्र**

१) हास्य चेहऱ्याला सुंदरता देते तसेच, हास्यामुळे शरीराच्या मुख्य अवयवाला म्हणजेच चेहऱ्याला व्यायाम मिळतो.

२) हास्यामुळे चेहऱ्याशी निगडित स्नायूंना व्यायाम मिळून, रक्ताभिसरण होण्यास मदत होते.

३) 'हास्ययोग' करताना टाळ्या वाजवल्या जातात. त्यामुळे हाताच्या बोटांवर असलेले अक्युप्रेशरचे पॉईंट प्रेस होतात व त्यामुळे हाताचा व्यायाम होऊन, हाताकडे रक्तपुरवठा होतो.

**हास्ययोगाचे उपयोग**

१) हसल्यामुळे चेहरा आनंदी, प्रसन्न, ताजातवाना तसेच प्रफुल्लित व टवटवीत होतो.

२) चेहरा आनंदी झाल्यामुळे मनही प्रसन्न होते व त्यामुळे संपूर्ण दिवस प्रसन्न व उत्साही राहतो.

३) मन प्रसन्न व आनंदी झाल्यामुळे कामाचा थकवा व अभ्यासाचा ताणतणाव दूर होतो.

४) शरीर आनंदी असल्यामुळे स्मरणशक्तीला चालना मिळते.

५) स्मरणशक्ती वाढल्यामुळे अभ्यास वाढतो व त्यामुळे प्रगती होते.

६) अभ्यासाच्या प्रगतीमुळे संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित होते. व्यक्तीतील आत्मविश्वास वाढून जीवनात यशस्वी होण्यास मदत होते.

**हास्याची घोषवाक्ये**

१) एक दोन तीन चार, दिन में हसो बार बार

२) चार पाँच छः सात, हसके करो सबसे बात

# नागपूर कऱ्हाडे ब्राह्मण संघ - सभा वृत्तांत

दि. २१ डिसेंबर २०१४ ला नागपूर येथे झालेल्या सभेचा वृत्तांत

जून २०१४ मध्ये खानापूर (बेळगाव) येथे झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सदरहू बैठक नागपूर संघाने आयोजित केली होती.

सर्व प्रतिनिधी आदल्या दिवशीच दाखल झाले होते.

सकाळी सर्व प्रतिनिधींची नोंदणी झाल्यानंतर १० वाजता सभेस सुरुवात झाली.

प्रथम ॲड. मनीष नवाथे (नागपूर) यांनी सर्व प्रतिनिधींचे स्वागत केले. त्यानंतर अध्यक्ष, कार्यवाह आणि संपर्क संपादक स्थानापन्न झाल्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले.

पहिला विषय : उपस्थित प्रतिनिधींनी आपापली ओळख करून दिली.

दूसरा विषय : मागील सभेचा वृत्तांत कार्यवाह श्री. भाटवडेकर यांनी वाचून दाखवला आणि त्याला सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

तिसरा विषय : संपर्क प्रगती आढावा. याबाबत संपादक श्री. गुर्जर यांनी सविस्तर निवेदन केले. त्यावर बरीच साधक बाधक चर्चा झाली. त्यात सर्वांनी सहभाग घेतला होता. याखेरीज महासंघाचा ई-मेल ॲड्रेस तयार केला असे सांगितले. तो असा आहे... bkbmsindia@gmail.com याचा सर्वांनी वापर करावा असे प्रतिपादन केले. चर्चेत पुढील प्रमाणे विचार मांडले गेले.

सुनील जठार (रत्नागिरी) यांनी कार्यकारिणीचा कालावधी ३ वरून ५ वर्षे करावा असे सुचवले.

विनायक जांभेकर (डोंबिवली) यांनी वरील सूचनेचा पाठिंबा व्यक्त केला आणि सद्य कार्यकारिणीचे कामकाज समाधानकारक चालू आहे असे मत व्यक्त केले.

स्वाती प्रभुदेसाई(डोंबिवली) यांनी वार्षिक वर्गणी अधिक वर्षाची घेण्यास मान्यता द्यावी अशी सूचना मांडली. ३-५-१० वर्षापर्यंत वर्गणी घेण्याने वर्गणीचा पाठपुरावा करण्याचे काम कमी होऊ शकेल. आजीवन वर्गणीदार होऊ शकतो का याचा देखील विचार व्हावा असे सांगितले. यावर श्री. फणसळकर (पुणे) यांनी याबाबत वर्गणीदारांना ऐच्छिकता असावी असे सांगितले.

श्री. गुर्जर यांनी वर्गणीदार क्र. चा खुलासा केला. पहिल्या वर्गणीचा पावती क्र. हाच वर्गणीदार नंबर असेल. मा. अध्यक्ष श्री. पराडकर यांनी प्रचलित महागाई लक्षात घेता वर्गणी १०० ऐवजी १२५/१३० पर्यंत वाढवण्यास हरकत नसावी असे सांगितले.

श्री. विनायक जांभेकर यांनी वर्गणी तशीच ठेवावी अशी सूचना केली व ५ वर्षापर्यंतची वर्गणी घ्यावी असे सांगितले. श्री. जयंत लघाटे (मुलुंड) यांनी महासंघाचा निधी असावा जो गरजेप्रमाणे सभासद संघाला मिळावा अशी सूचना केली. श्री. नवाथे (नागपूर) यांनी संपर्कचा खर्च आणि जाहिराती यासंबंधी आपले विचार व्यक्त केले. श्री. फणसळकर (पुणे) यांनी जाहिराती गोळा करण्यास सर्व संघांनी मदत करावी असे सांगितले. स्वाती प्रभुदेसाई यांनी बहुमोल मत मांडले. ''संपर्क'' चा म.टा.होऊ नये. जाहिरातींच्या बरोबर विविध विषयावरील लेख किंवा उपयुक्त माहिती याला प्राधान्य असावे. सर्व संघांनी आपापल्या झालेल्या कार्यक्रमाबद्दल माहिती द्यावी. श्री. मावळकर (मुंबई) यांनी सर्व संघांचे पत्ते/फोन नं./ई-मेल वगैरे माहिती उपलब्ध करून द्यावी अशी सूचना केली. यंदा 'संपर्क'' ला १० वर्षे पूर्ण होत आहेत. तरी प्रत्येक संघाची सविस्तर माहिती द्यावी अशी संपादक श्री. गुर्जर यांनी विनंती केली. तसेच स्थापना दिवस कोणता आहे याची डोंबिवली संघाने माहिती द्यावी अशी विनंती केली.

चर्चे अखेर सध्या फक्त ५ वर्षे पर्यंतची घ्यावी असे ठरले. आजीवन सभासद या संबंधी निर्णय वार्षिक सभेत घेण्यात यावा असे ठरवण्यात आले.

यानंतर इतर विषय नसल्यामुळे अध्यक्ष यांनी खुल्या चर्चेला परवानगी दिली.

१. श्री. सुनील जठार - ''कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास'' (लेखक-श्री. आठल्ये) रत्नागिरी संघाकडे उपलब्ध आहे असे सांगितले. त्याची छापील किंमत रु. ५०/- आहे. संघांच्याकरता ते रु.३०/- उपलब्ध आहे.

२. श्री. विनायक जांभेकर ..महासंघाची वार्षिक वर्गणी (सभासद संख्येप्रमाणे) रु. २०१०/- चेक अध्यक्ष यांच्याकडे सुपूर्द केला. वधू-वर मंडळाची माहिती देवाण-घेवाण करण्यात यावी अशी सूचना केली. शिवाय आपापले शैक्षणिक निधी एकत्रित करून विद्यार्थ्यांना मदत करता येईल का याचा विचार व्हावा असे सुचले.

३. श्री. शेखर मावळंकर यांनी त्यांचे शैक्षणिक निधी संबंधी अनुभव सांगितले. मदत देतांना करार पत्र करून देखील परतफेड करताना विसर होतो. तसेच वैद्यकीय मदत करताना कागदपत्रे अचूक नसतात.

४. श्री. विनायक जांभेकर: बिझिनेस फोरम ची माहिती सांगितली. सभासद आपापसात बिझिनेसची देवाणघेवाण करतात.

५. श्री. पाध्ये: वधू-वर माहिती देवाण घेवाण करावी असे सुचवले. रा. स्व.सं. चे प्रमुख श्री. भागवत यांचा फोटो संपर्क मध्ये छापावा असे सुचवले.

६. श्री. बेलवलकर(नागपूर) यांनी श्री. विश्राम जामदार यांची कर्नाटक शैक्षणिक बोर्डाचे अध्यक्ष झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करावा असे सुचवले. त्या ऐवजी त्यांना अभिनंदनाचे पत्र पाठवावे असे ठरले.

७. श्री. सुनील जठार : राज्याच्या नवीन मंत्रिमंडळातील कऱ्हाडे मंत्र्यांना अभिनंदन पर संदेश पाठवावा.

८. श्री. गुर्जर, श्री. जयंत नारळीकर आणि श्री. श्रीकांत मोघे यांना अलीकडेच मिळालेल्या पुरस्काराबाबत अभिनंदनाचा ठराव पास करावा.

९. मागील सभेत सिर्सीचे श्री. स्वादी यांनी केलेल्या आवाहनानुसार मदत करावी असे श्री. फणसळकर यांनी आवाहन केले. पुणे संघ रु. ५०००/- पाठवणार असे सांगितले. इतरांनी देखील यथा शक्ती मदत करावी असे आवाहन केले. अध्यक्ष यांनी संपर्क मध्ये देखील आवाहन करावे अशी सूचना केली.

१०. श्री. गुर्जर व श्री. पराडकर यांनी संघाचे अहवाल/कार्यकारिणीची माहिती जून बैठकीत घेऊन यावी असे सांगितले.

११. पुढील बैठक जून मध्ये पुणे संघ आयोजित करेल. ही वार्षिक सभा असेल. डिसेंबरची बैठक रत्नागिरी संघ आयोजित करणार आहे. इंदूरचे प्रतिनिधी श्री. शशीकांत मोघे यांनी देखील आपण आयोजन करू शकतो असे सांगितले.

१२. महासंघाच्या प्रत्येक बैठकीला प्रत्येक संघाने कमीत कमी २ प्रतिनिधी पाठवावे असे ठरले. यात संपर्क प्रतिनिधी आणि संघाच्या कार्यकारिणीतील सदस्य असावेत.

१३. महासंघाच्या वाढीकरता म.प्र. मधील सागर, ग्वाल्हेर अशा शहरात संघ स्थापन होऊ शकतील काय याचा विचार **पान क्र. २८ वर**


रुग्ण दिलासा
वैद्यकीय व सामाजिक मार्गदर्शन
थोडेसे वाचा, पुष्कळ मिळवा!
एकत्र या, चिंतामुक्त व्हा, अभिव्यक्त व्हा!
संपादक - डॉ. सुहास नेने
संकलन - श्री. अरुण गणपत्ये
रु. ३६०/- इतक्या कमी किंमतीत
रुग्ण निदान पद्धती
मुख्य औषधोपचार प्रणाली
शारिरिक तपासण्या विषयक माहिती
महत्वाच्या इंद्रियांची ओळख
निवडक रोगांची माहिती
आर्थिक मदत कोठून व कशी?
नवीन तंत्रज्ञाना विषयी
जेष्ठ नागरिकांसाठी सल्ला
रक्तदान, नेत्रदान व देहदाना विषयी
नामांकित वैद्यकीय तज्ज्ञांनी अभ्यासून शिफारस केलेले संग्राह्य पुस्तक
रजि. ऑफिस : शॉप १०, डी विंग, स्नेहल अपार्टमेंट, सणस हायस्कूल शेजारी,
सिंहगड रोड, धायरी फाटा, पुणे - ४११ ०४१. | फोन : ०२०-२४३९०१८९
| मोबाइल - ९४२३१७५५३४ | इ.मेल. abhijit.ganpatye@gmail.com
अंजली प्रकाशन
अभिजात प्रिंटर्स अँड प्रोसेसर्स प्रा. लि. चा उपक्रम
CIN : U29294MH1991PTCO61558

## नागपूर क-हाडे ब्राह्मण संघ – सभा वृत्तांत

पान क्र. २६ वरून

व्हावा.

१४. श्री. फणसळकर (पुणे) यांनी पुणे येथील बिझिनेस फोरम ची माहिती दिली.

१५. श्री. शेखर मावळंकर यांनी अशा बैठकीबरोबर एखादी सहल आयोजित करता येईल का याचा विचार व्हावा. यानंतर काही विषय नसल्यामुळे अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**उपस्थिती :**

१. नागपूर :श्री. पराडकर, श्री. जावडेकर, श्री.नवाथे, श्री. ढवळे, श्री. बेलवलकर, श्री. पाध्ये.

२. पुणे : श्री. गुर्जर, श्री. भाटवडेकर, श्री. फणसळकर, श्री. पुराणिक.

३. रत्नागिरी : श्री. जठार

४. मुलुंड : श्री. लघाटे

५. डोंबिवली : श्री. जांभेकर, श्रीमती प्रभुदेसाई, सौ. धामणकर

६. इंदूर : श्री. शशिकांत मोघे.

**विशेष उल्लेख :**

नागपूर संघाने आयोजन अगदी नेटके केले होते. रेल्वेने येणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीशी सतत संपर्क होता आणि स्टेशन वरून हॉटेल पर्यंतची वाहन व्यवस्था चोख होती. हॉटेल मध्ये रुम्स देखील बुक केलेल्या होत्या. खाण्यापिण्याची व्यवस्था अगदी क्ऱ्हाडी पद्धतीनुसार होती. शेवटी स्टेशन पर्यंत देखील वाहन व्यवस्था होती.

नागपूर मध्ये मिळणाऱ्या विशेष वस्तू संबंधी प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे (सशुल्क) आणून ठेवले होते. कोणालाही बाजारात जावे लागले नाही. सभा २१ तारखेला होती तरी देखील २० तारखेला एक स्थानिक सहल (सशुल्क) आयोजित करून कोणालाही वेळ कसा घालवावा अशी चिंता पडली नाही.

असे आयोजन पुढील सर्व आयोजकांना एक मैलाचा दगड ठरवा (Bench mark) ठरावा.


फणसळकर
कोंकण काजू



कोकण काजू सांडगी मिरची
फणस–तळलेले गरे काजूकतली

उत्पादक :
प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर
मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी
फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१

WITH BEST COMPLIMENTS FROM
मे. डी.व्ही. भाटवडेकर क्लॉथ मर्चंटस्
फोन नं. – २४४५६०४७
६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू. म. वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११ ०३०,

कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लाँग क्लॉथ, पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीटस्, टॉवेल्स, रेडीमेड पायजमे बंडी – कुडते – बर्म्युडा – ३/४ पँटस्

अधिकृत विक्रेते
युनायटेड होजिअरी – कॅप्टन होजिअरी

निकेत फोटोज्
कर्वेनगर शाखा
सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

*अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  a. Branded
  b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  a. Desktop
  b. Laptops
  c. Network
  d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net


इन्शुरन्स स्पेशालिस्ट
सुरक्षित करा आपले भवितव्य
सर्व प्रकारच्या विमा योजना एकाच ठिकाणी उपलब्ध.
१) जीवन विमा
२) आरोग्य विमा (मेडिक्लेम)
३) वाहन विमा
४) अपघात विमा
५) प्रवासी विमा
६) मालमत्ता (प्रॉपर्टी) विमा
७) संस्थेचा विमा
८) सागरी (मरिन) विमा
९) सामुदायिक विमा(ग्रुप इंन्शुरन्स)
१०) अनिवासी भारतीय विमा
मंगेश जांभेकर
मोबाईल : ९८१९७ ५०९५५
Email : mangesh.jambhekar@gmail.com
Office Add.: Cabin No. 2, Prime Space Business Centre, So Lucky HSG. Society
M. G. Road, Above Sunder Hotel, Vile Parle East, Mumbai 400057


सुयश कॅटरर्स
१९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा
आपुलकीने सेवा देणारी माणसं
माऊली हॉल
मिनी माऊली हॉल
सर्वेश हॉल
मंगलमूर्ती समाग्रह
ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.
संपूर्ण व्यवस्थापन
सुहास व स्वाती पंडित यांचे भ्रमणध्वनी
९८३३३०४०३३
९८३३०४२७३३
अन्य संपर्क
सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८
योगेश कानेटकर-९८१९०३९३५९
सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)

# संस्था वृत्त – सातारा, आमचे उपक्रम – वर्धापनदिन

रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा आणि श्रावणी पौर्णिमा अशी तीन उत्सवांचा त्रिवेणी संगम–२००१ साली एक सांघिक गरज म्हणून कऱ्हाडे ब्राह्मण संघाची साताऱ्यात स्थापना झाली. दरवर्षी या दिवशी संघाचा वर्धापन दिन साजरा होतो. यावर्षीही १० ऑगस्ट २०१४ रोजी संघाचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला.

यावर्षी कार्यक्रमासाठी डॉ. सौ. सुजाता करंबेळकर, कराड यांना निमंत्रित केले होते. अध्यक्षस्थानी संघातील ज्येष्ठ महिला सदस्या श्रीमती अनुराधा महाजनी होत्या. कऱ्हाडे ब्राह्मण संघ साताराचे अध्यक्ष श्री. यशवंत पंडित यांनी निमंत्रितांचे व अध्यक्षांचे स्वागत श्रीफळ, पुष्पगुच्छ व शाल देऊन केले. सौ. सुजाता कानेटकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कऱ्हाडे ब्राह्मण बुद्धीवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा आयोजित केला होता. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लागावी म्हणून यावर्षी विद्यार्थ्यांना वाचनीय पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. करंबेळकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अगदी तिसरीच्या स्पर्धापरीक्षेपासून ते पदव्युत्तर परीक्षेपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना समाविष्ट करण्यात आले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे डॉ. करंबेळकर यांनी कौतुक आणि अभिनंदन केले. सर्व उपस्थितांना योग्य आहार आणि विहार याबाबत अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड. सौ. तळवलकर यांनी केले.

श्री. सुरेश साधले यांनी सर्वांचे आभार मानले. नंतर अल्पोपहार आणि कॉफी पान होऊन कार्यक्रम संपला.

**कोजागिरी पौर्णिमा**

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा यांनी दरवर्षीप्रमाणे कोजागिरीचा कार्यक्रम दि. ११ ऑक्टोबर २०१४ रोजी आयोजित केला होता. यावर्षी कोजागिरी निमित्त 'गीत गुंजन' ग्रुप सातारा यांचा हिंदी–मराठी भावगीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. कानेटकर यांनी केले. श्री. सप्रे यांनी सर्व कलाकारांचा परिचय करून दिला. सर्वच गीतांना श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नवोदित कलाकार कु. निलांबरी गुर्जर हिने 'दिल अपना और प्रीत पराई' या जुन्या चित्रपटातील गीत सादर केले. या गीताने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. श्रोत्यांनी वन्स मोअर दिला.

साडेआठपर्यंत चाललेल्या या संगीत मैफिलीत श्रोते न्हाऊन निघाले. संघाचे अध्यक्ष श्री. यशवंत पंडित यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. श्री. तळवलकर यांनी सर्वांचे आभार मानले. दुग्धपान होऊन कार्यक्रम संपला.

दोन्ही कार्यक्रमांना श्रोत्यांची उपस्थिती भरपूर होती.

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**
(व्यवस्थापन)
**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)
**श्रुति मंगल कार्यालय**
आमचे मार्गदर्शक व आमचे सद्‌गुरू
**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**
**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२११९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

# वसुधा एंटरप्रायजेस

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टॅंक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

**वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...**
**... सर्व सेवा एकाच छताखाली**

**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**

**WITH BEST COMPLIMENTS FROM**

# J.P.F. Metacast Private Limited

Plot No. 7,16 & 32, S.No. 589 & 607, Machhe industrial Estate,
Belgaum 590014. Phone : 0831-2440664,
Fax: 0831-2441069 E-mail : admin@jpfmetacast.com,
Website : www.jpfmetacast.com

- 1st ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007
- Winner of Jayaswal Neco Quality Award 2012
- Manufacturers of CI & S G I, machined & unmachined Castings.
- ISO 9001:2008 COMPANY
- Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Componant & Intricate Castings, Cylinder Heads.